# शब्द रुची

डिसेंबर २०१३ मूल्य १० रुपये





**'जैतापूरचे अणुमंथन' पुस्तक प्रकाशनसमयी जैतापूर अणुऊर्जाप्रकल्प संचालक संदीप सिंघारॉय, उद्योगमंत्री नारायण राणे, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, कुमार केतकर आणि लेखक राजा पटवर्धन**




**'डॉ. रघुनाथ माशेलकर : भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता' पुस्तक प्रकाशनसमयी लेखक अ.पां. देशपांडे, डॉ. रघुनाथ माशेलकर, मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रभाकर देवधर, प्रा. एम.एम. शर्मा (एफआरएस) आणि सारस्वत बँकेचे उपाध्यक्ष सुशील संझगिरी**

# डॉ. नरेंद्र जाधव संवादयात्रा

## ग्रंथप्रदर्शन क्षणचित्रे

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी "सेंट्रल" "CENTRAL" TO YOU SINCE 1911
www.centralbankofindia.co.in

सेंट्रल बँकेच्या सहकार्याने

औरंगाबाद




लातूर






अहमदपूर






नांदेड






बारामती





ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**डिसेंबर २०१३, वर्ष १**
**अंक सातवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व मांडणी : **योगिता मोरे**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**
granthalisales@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठा–समान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

भारतरत्न मिळवणं ही जणू एक स्पर्धा आहे, त्यामुळे हा सर्वोच्च किताब सन्मानानं प्राप्त होणाऱ्या व्यक्तीचं वर्णन 'भारतरत्न विजेते' असं केलं जात असावं. 'भारतरत्न विजेते सीएनआर राव' अशी बातमीची सुरुवात सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात पाहिली आणि डोळ्यांसमोर चित्र उभं राहिलं, की कर्पुरी ठाकूर, अटलबिहारी वाजपेयी, कांशिराम, ध्यानचंद, सचिन आणि राव... धावताहेत. त्यात सचिन आणि राव यांच्यात बरोबरी होते आणि दोघं भारतरत्न जिंकतात! पद्म पुरस्कारांबाबत चालणारी अनागोंदी आपण पाहतोच, आता 'भारतरत्न'बाबत झडणाऱ्या चर्चा पाहिल्या की आपलं सामाजिक–मानसिक पर्यावरण काय आहे हे ध्यानी येतं. सीएनआर राव यांची प्रतिक्रिया रोखठोक व बोलकी होते, ती अशा पार्श्वभूमीवर योग्यच वाटते. कशाला आणि किती मायलेज द्यायचं आणि टीआरपी पाहायचा हे केवळ माध्यमंच करतात असं नाही, तर राजकारणी आणि तथाकथित समाजकारणीही तेच करत आहेत. आपली व दुसऱ्याची प्रतिष्ठा राखणं याचं महत्त्व गरजेचं नसलेलं दिसतं. मग तहलका 'माजतो' आणि 'आम–आदमी'ची झोप उडते! 'सामान्य'ज्ञान असं वाढतं.

माणसाच्या दूषित मानसिक पर्यावरणाला लगाम निसर्ग घालू लागला आहे. आपण ओझोन भ्रष्ट करू लागलो नि निसर्ग आग ओकू लागला. कुठे पाण्याचा अतिवापर आणि कुठे वाहून जाणारं पाणी या दोन्हीकडे सोयीनं दुर्लक्ष केलं आणि नशिबी ओला–सुका दुष्काळ आला. 'आलास तर माझ्यासह, नाहीतर तुझ्याशिवाय' असा माज माणसानं केला आणि 'पर्यावरण निर्वासित' असा अतर्क्य प्रश्न माणसापुढे उभा राहिला. 'निर्वासिता'ची कायद्यातील व्याख्या निसर्गलीलेपुढे कशी गोंधळली हे अपर्णा पाटील यांच्या लेखात समजेल.

'जैतापूरचं अणुमंथन' हे पुस्तक 'ग्रंथाली'नं नुकतंच प्रकाशित केलं. एकूणच ऊर्जेबाबत काय स्थिती आहे, भविष्यात काय घडू शकतं आणि 'अणुवीज प्रकल्प' कसे व का उभे राहत आहेत याबाबत सुबोध विवेचन या प्रकाशनसमयी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केलं. ते या अंकात आहे.

२५ डिसेंबर हा वाचकदिन नवीन पुस्तकं आणि न चुकता हजेरी लावावी अशा कार्यक्रमानं रंगणार आहे, नोंद ठेवावी.

**– अरुण जोशी**

# 'जैतापूरचे अणुमंथन' प्रकाशनसमयी मुख्यमंत्र्यांचे भाषण

**धनंजय गांगल**

२६ ऑक्टोबर २०१३ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते 'जैतापूरचे अणुमंथन' या राजा पटवर्धन यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'ग्रंथाली'चे हे ५५४ वे प्रकाशन. हा प्रकाशन सोहळा मुंबईच्या सह्याद्री अतिथीगृहात पार पडला. या समारंभाला उद्योगमंत्री नारायण राणे, दिव्य मराठीचे संपादक कुमार केतकर, जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाचे संचालक संदीप सिंघारॉय, माजी मुख्य संचालक सी.बी. जैन व लेखक राजा पटवर्धन उपस्थित होते. पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी अणुऊर्जेच्या अपरिहार्यतेचे संपूर्ण चित्रच रेखाटले.

पृथ्वीराज चव्हाण आपल्या भाषणात म्हणाले, ''लेखक राजा पटवर्धन हे भूमिपुत्र आहेत. प्रकल्प परिसरातील जानशी गावात जन्मलेल्या राजाभाऊंचे शिक्षण जैतापूर हायस्कूलमध्ये झाले. भूमिपुत्राने पोटतिडकीने लिहिलेले हे पुस्तक असून, जैतापूर प्रकल्पाचा सर्व बाजूंनी विचार करून अत्यंत मुद्देसूद पद्धतीने त्याची मांडणी त्यांनी केलेली आहे. भावी पिढ्यांनाही मार्गदर्शन करणारे हे पुस्तक आहे. सर्वांनी ते वाचावे इतके ते उपयुक्त आहे.

''सन २००४ पासून संयुक्त पुरोगामी आघाडीच्या केंद्र सरकारमध्ये माझी 'राज्यमंत्री' म्हणून नियुक्ती झाली. पंतप्रधान कार्यालयाचा कारभार मी पाहू लागलो. पहिल्या मंत्रिमंडळापासून आजपर्यंत अंतरिक्ष व अणुऊर्जा ही दोन्ही खाती नेहमीच पंतप्रधानांनी स्वत:च्या हातात ठेवलेली आहेत. देशाच्या संरक्षण व सुरक्षेचे महत्त्वपूर्ण निर्णय या खात्याला घ्यावयाचे असतात. मी




अणुऊर्जा खात्याचा राज्यमंत्री नव्हतो, परंतु पंतप्रधानांनी अणुऊर्जा खात्याचा स्वतंत्र कारभार माझ्यावर सोपवला होता. तोपर्यंत मला खासदार म्हणून संसदीय व्यवहाराचा अनुभव होता. अणुऊर्जा खात्याची संपूर्ण जबाबदारी मला घ्यायची असल्याने त्या विषयाची संपूर्ण माहिती मिळवणे अत्यंत गरजेचे होते. अणुऊर्जा आयोग याबाबत संपूर्ण अभ्यास करतो, म्हणून मला त्या महत्त्वाच्या आयोगाचे सभासदत्व दिले गेले. ही मोठी जबाबदारीची जागा होती. त्यामुळे देशातील मोठमोठ्या शास्त्रज्ञांशी माझे अत्यंत जवळून संबंध आले. शासकीय अत्युच्च अधिकाऱ्यांशी चर्चा-विचारविनिमय करण्याची संधी मिळाली. डॉ. अनिल काकोडकर हेही त्या चर्चेत सहभागी असायचे. अशा या उच्चस्तरीय शास्त्रज्ञाकडून माझे प्रशिक्षण झाले. राजकीय जीवनातील व्यक्तीने देशातील सर्व अणुप्रकल्पांचा इतक्या जवळून अभ्यास करण्याचे भाग्य बहुधा माझ्याच वाट्याला आले असावे. मी इंजिनीयर असल्याने मीही त्यात रस घेऊन सखोल अभ्यास केला. अणुऊर्जा खात्याचा २००४ ते २०१० इतका प्रदीर्घ अनुभव मला सलगपणे घेता आला. २०१० नोव्हेंबरला महाराष्ट्र राज्याची जबाबदारी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग व पक्षाध्यक्ष श्रीमती सोनियाजी यांनी माझ्यावर सोपवली म्हणून मी मुंबईत आलो. अणुऊर्जा खात्याची पार्श्वभूमी असलेला मी महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री झालो. कारभाराच्या पहिल्याच दिवसापासून मी जैतापूर प्रकल्पाच्या प्रश्नात जातीने लक्ष घातले.

''जैतापूर प्रकल्पाची पूर्वतयारी युपीए सरकार स्थापन होण्यापूर्वीपासून सुरू होती. आज एका भूमिपुत्राने हा सर्व इतिहास, विषय क्लिष्ट व शास्त्रीय असूनही अत्यंत सखोल अभ्यास करून अतिशय सोप्या भाषेत कथन केला आहे. पुस्तक वाचून झाल्यावर राणेसाहेबांच्या सूचनेप्रमाणे मी या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे मान्य केले. राजाभाऊंच्या या प्रयत्नाचे कौतुकच करायला हवे. स्थानिक राजकारणाचा राजाभाऊंनी उल्लेख केलेला आहे. एन्रॉन हा देशातील पहिला सार्वजनिक व खाजगी असा संयुक्त, परदेशाच्या मदतीने होणारा प्रकल्प होता. तोपर्यंत वीज उत्पादन हे मुख्यत: सार्वजनिक क्षेत्रापुरतेच मर्यादित होते. दुर्दैवाने आपली ज्या एन्रॉनशी गाठ पडली त्या कंपनीने जगातला सर्वात मोठा घोटाळा (फ्रॉड) केला. परंतु तांत्रिक दृष्ट्या हा प्रकल्प योग्यच होता, असे तज्ज्ञांचे मत होते. शिवसेना-भाजपा सरकारने हा प्रकल्प प्रथम समुद्रात बुडवला व नंतर क्षमता वाढवून

मंजूर केला. या कराराला केंद्र सरकारची हमी दिलेली होती. अमेरिकेतील सरकारी विमा कंपनीशी कर्जफेडीचा करार केलेला होता त्यामुळे एन्‍रॉन बुडाली तरी, करार अमेरिकन सरकारशी असल्याकारणाने कर्ज फेडणे ही भारत सरकारची कायदेशीर जबाबदारी होती. तब्बल तेरा हजार कोटींचे कर्ज फेडून, बंद झालेला हा प्रकल्प सुरू करावा लागला. २००० मेगा वॉट क्षमतेचा हा प्रकल्प गॅसवर चालायचा होता. आज आपली विजेची उत्पादनक्षमता सव्वादोन लक्ष युनिट्स इतकी आहे. १९४७ साली ती फक्त १५०० मेगा वॉट इतकी अल्प होती. आपण या क्षेत्रात बरीच मजल मारलेली असली तरी जगाच्या मानाने खूपच मागे आहोत. आपली क्षमता सव्वादोन लाखांची तर चीनची दहा लाख मेगा वॉटची! म्हणूनच काहीही करून दाभोळचाही प्रकल्प सुरू करण्यासाठी सर्व प्रयत्न केले. आज तो इंधनाअभावी बंद आहे. भारतातला दरडोई वीजवापर, राणेसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे, ७००-७५० युनिट्स प्रतिवर्षी असून जगातील प्रगत देशात हे प्रमाण १० ते १२ हजार युनिट्स इतके म्हणजे आपल्यापेक्षा १४ ते १६ पट अधिक आहे. आपल्या देशात ही वीज मुख्यत: कोळशापासून बनवली जाते. ६७-६८ टक्के वीजेसाठी कोळसा हे इंधन वापरले जाते. सतरा ते अठरा टक्के जलविद्युत आहे. सौर-पवन-जैव इत्यादी घटकांतून सुमारे १२ टक्के वीज मिळते व अणुऊर्जा २ ते २.५ टक्के इतकी अल्प आहे. पंडित नेहरूंच्या काळापासून आपण अणुऊर्जेचे महत्त्व जाणून आहोत म्हणूनच डॉ. भाभांसारख्या शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईत अणुऊर्जा संशोधन प्रयोगशाळांची निर्मिती केली. आपल्याला अणुऊर्जेचे प्रमाण वाढवण्याची गरज आहे.

''आपला कोळसा आताच्या सारखाच वापरला तर शंभर किंवा दीडशे वर्षांत संपून जाईल. आताच आपण पेट्रोल, डिझेल इत्यादी इंधने वाहन उद्योगासाठी वापरतो. आखाती देशातून याचा पुरवठा थांबला तर सर्व गाडे बंद होऊ शकते. सध्याचा प्रती बॅरल १०० डॉलर हा भाव परवडत नाही, तो आणखी वाढेल. आपण ऊर्जेच्या इंधनासंबंधी ८५ टक्के आयातीवर अवलंबून आहोत. प्रत्येक वर्षी हे प्रमाण वाढत आहे. लवकरच आपल्या गरजेच्या ९०% पुरवठा हा परदेशावर अवलंबून राहणार आहे. थोडक्यात, आपली अर्थव्यवस्था इंधनाच्या दृष्टीने अत्यंत नाजूक अवस्थेत सापडली आहे. पेट्रोलचे भाव किती वाढतील हे सांगता येत नाही. आपण बॉम्बे हाय, गोदावरी असे साठे शोधून काढले. त्या स्रोतांचा साठा किती याच्या अंदाजावरून वादविवाद होतात. कुणी म्हणतो साठा अधिक आहे तर कुणी म्हणतात व्यापारी नफ्यासाठी हा अंदाज कमी दाखवला जातो. आज स्थिती अशी आहे की दाभोळ वीज प्रकल्पाला एक क्युबिक मीटर इतकाही गॅस उपलब्ध नसल्याने २००० मेगा वॉटचा प्रकल्प बंद आहे. आपल्या देशात मिळणाऱ्या कोळशात राख जास्त असल्याने चांगल्या प्रतीचा कोळसा ऑस्ट्रेलिया-इंडोनेशिया इत्यादी देशांतून आणतो. महाराष्ट्रात तो कोकणच्या किनाऱ्यावर आणावा लागतो. म्हणून कोकणात वीज कारखाने काढणे तुलनेने स्वस्त पडते. वीज सर्व क्षेत्राला आवश्यक असते. उद्योग-शेती-व्यापार. विजेला पर्यायच नाही. म्हणून या अणुऊर्जेच्या अत्यंत महत्त्वाच्या स्रोताचा विचार महत्त्वाचा ठरतो. अणुतंत्रज्ञान आपण विकसित केले व २० पैकी १८ अणुवीज प्रकल्पांत भारतीय तंत्रज्ञान वापरले जाते. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने आपल्याला अणुवीजप्रकल्पांची गरज आहे. ती क्षमता वाढवण्यासाठी आपल्याला युरेनियम या इंधनाची गरज आहे. आपल्या देशातील जादुगोडा इथले साठे या सुरक्षेच्या दृष्टीने अपुरे आहेत. तंत्रज्ञान आहे पण इंधन अपुरे आहे. म्हणून अणुकरार करणे महत्त्वाचे होते. आपला वाढता अणुऊर्जा कार्यक्रम जगाच्या दृष्टीने मोठी बाजारपेठ आहे. आपण बॉम्ब बनवला म्हणून न्युक्लिअर सप्लाय ग्रूप म्हणजे अणुइंधनपुरवठा करणारे जे देश आहेत त्यांनी आपल्याला वाळीत टाकले होते. ती बंधने दूर करून घेऊनच आपण युरेनियमचा आवश्यक तेवढा साठा करू शकतो. ही बंधने उठवायला युरेनियम पुरवठा करणारे देश तयार झाले. त्यांनी 'आमच्या भट्ट्या घ्या व इंधनही घ्या' अशी देवाणघेवाण केली. आपण भट्ट्या खरेदी करण्याचे गाजर दाखवून युरेनियम खरेदी करण्याच्या योजना आखल्या. हाच तो जागतिक अणुसहकार्य करार. त्या करारा-प्रमाणे देशभर अनेक ठिकाणी विविध देशांकडून अणुवीजभट्ट्या घेणार आहोत. पहिला करार जैतापूरसाठी फ्रान्सच्या अरेवा कंपनीबरोबर झाला. त्याच्या अंतिम स्वरूपाच्या चर्चा सुरू आहेत. जैतापूरची जागा सर्वात उत्तम आहे. प्रकल्पाला सर्वात योग्य. NPCIL व अरेवा यांच्यात घासाघीस- शंभर-दोनशे कोटी रुपये कमीअधिक - अशा वाटाघाटी सुरू आहेत. जपानच्या दुर्घटनेनंतर जगभरच या प्रकल्पांना विलंब होऊ लागला. तरीही या ऊर्जास्रोताचे महत्त्व कुणीही नाकारू शकत नाही. अमेरिकेने पुढाकार घेऊन करार केला म्हणून डाव्यांचा विरोध. स्थानिकांचा स्थानिक राजकारणाचा भाग म्हणून विरोध. हा विरोध पत्करून जैतापूर प्रकल्पाचे महत्त्व सांगणारी भूमिका राजाभाऊ पटवर्धनांनी देशहितासाठी घेतली. नारायण राणेसाहेबांनी विरोधकांशी चर्चा करून चांगला मोबदला मिळवून दिला. आता स्थानिक विरोध उरलेला नाही. आंदोलन संपलेले आहे. डॉ. अनिल काकोडकर आज येणार होते. काही कारणाने येऊ शकले नाहीत. त्यांनीही या प्रकल्पाला जोरदार पाठिंबा दिला आहे.

''जैतापूरला प्रथम दोन भट्ट्या सुरू होतील. नंतर ती संख्या वाढत जाऊन सहा भट्ट्या उभारल्या जातील. कुडानकुलमला रशियन बनावटीच्या भट्ट्या सुरू झाल्या आहेत. परदेशी इंधनावर उभारला जाणारा जैतापूर हा पहिला प्रकल्प असणार आहे.

''अणुवीजेची अपरिहार्यता राजाभाऊंनी अत्यंत पोटतिडकीने मांडली आहे. हा सर्व इतिहास, सर्व गैरसमज दूर करणारे हे प्रतिपादन साहित्यात मोलाची भर घालणारे आहे. प्रत्येकाने हे पुस्तक वाचावे. भावी पिढीलाही मार्गदर्शन करणारे असे पुस्तक लिहिल्याबद्दल राजाभाऊंचे मी आभार मानतो.''

कार्यक्रमाचे समयोचित सूत्रसंचालन प्रभाकर भिडे यांनी केले.

**- धनंजय गांगल**
dhanjay.gangal@gmail.com

# क्लायमेट रेफ्युजी!

## अपर्णा पाटील

यंदाच्या ऑस्करच्या सर्वोत्कृष्ट सिनेमांच्या नामांकनात 'बिस्ट ऑफ द सदर्न वाइल्ड' या सिनेमाचं नाव होतं. सिनेमात कोणी नामवंत नट नव्हते, ना चकाचक लोकेशन्स, ना आशादायी चित्र रंगवणारी कथा. केवळ नऊ वर्षांच्या मुलीची जगण्याची धडपड, यावरचा तो सिनेमा होता. मन आणि पोट ढवळून काढणारा हा अनुभव होता. एका काल्पनिक बेटावर एक वादळ येऊन धडकणार आहे. स्थानिक प्रशासन सगळ्यांना तिथून हलवण्याच्या तयारीला लागलंय. तिथल्या स्थानिक जनतेच्या मनात काही वेगळंच आहे. त्यांना आपलं घर सोडायचं नाहीये. त्यात एक पिता आहे आणि त्याची नऊ वर्षांची मुलगी आहे हशपपी नावाची. आपल्या घरातून विस्थापित होण्याचं दुःख काय असतं याची ही झलक काल्पनिक होती. पण शंभर टक्के वास्तवावर आधारित होती. त्याची आठवण होण्याचं कारण झालाय, आयन टिशेएट.

आयन टिशेएट हा सदतीस वर्षांचा आहे. टिशेएट हा गेल्या सहा वर्षांपासून न्यूझिलंडमध्ये राहतोय. त्याच्या तीन मुलांचा जन्मही याच देशात झाला आहे. न्यूझिलंडमध्ये आल्यावर त्याला वर्क व्हिसा मिळाला होता. तो, त्याची पत्नी, एकूण सहा मुलं असं आठ जणाचं कुटुंब न्यूझिलंडचे नागरिक झाले. जेव्हा हा व्हिसा संपला तेव्हा त्याला आपल्या देशात परतण्याचा आदेश देण्यात आला. त्यावर त्यानं, त्याच्या माझ्या देशात परतणं हे धोकादायक आहे, त्यामुळे आपल्यासह कुटुंबाला या देशातच राहण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती लवादाकडे केली. लवादानं त्याची मागणी योग्य आहे

**काही दिवसांपूर्वीची गोष्ट. दक्षिण पॅसिफिक बेटावरल्या एकानं न्यूझिलंड सरकारकडे एक आगळीच मागणी केली आहे. त्याचं म्हणणं आहे, की त्याला आणि त्याच्या कुटुंबाला पर्यावरण विस्थापित (क्लायमेट रेफ्युजी) म्हणून जाहीर करावं...**

तर आहे, पण त्याला कायदा मान्यता देऊ शकत नाही, असा निकाल दिला.

या निकालानंतर टिशेएटनं न्यूझिलंड हायकोर्टात आपल्याला 'क्लायमेट रेफ्युजी' घोषित करावं, अशी याचिका दाखल केली. अशा प्रकारची याचिका दाखल करणारा तो जगातील पहिलाच नागरिक आहे आणि क्लायमेट रेफ्युजी अशा संकल्पनेला मान्यता मिळावी, यासाठी दाखल झालेलं हे पहिलंच प्रकरण आहे.

किराबास (kiribati) हा देश तेहतीस छोट्या-छोट्या बेटांनी मिळून बनलेला आहे. जगातील सगळ्यात जास्त गरीब असलेल्यांपैकी किराबास हा देश आहे. कधी काळी ब्रिटिश वसाहतीचा भाग असलेली गिल्बर्ट आणि एलिस बेटंही याच देशाचा भाग आहेत. ब्रिटिश वसाहत असलेल्या या देशाला स्वातंत्र्य मिळालं ते १९७०च्या उत्तरार्धात. निसर्गानं भरभरून दिलेल्या या बेटसमूहांचा फारसा विकास मात्र झालेला नाही. किराबासच्या २०१०मध्ये झालेल्या जनगणनेनुसार तिथली लोकसंख्या एक लाख तीन हजार अठ्ठावन इतकी आहे. त्यापैकी बहुतांश लोक हे गिल्बर्ट बेटावर राहतात. तर लोकसंख्येच्या तेहतीस टक्के लोक दक्षिण तरावामध्ये. तरावा हे राजधानीचं शहर आहे. लोकांनी इथे पर्यटनासाठी यावं, स्थानिक जनतेला रोजगार मिळावा, यासाठी सरकार गेल्या तीन दशकांपासून प्रयत्न करत आहे. पण या निर्सगालाच आता क्लायमेंट चेंजचं ग्रहण लागलंय.

काही वर्षांपूर्वी बहुतांश लोक खेड्यात राहत होते. तेही बहुतांश समुद्रकिनारी असलेल्या गावांमध्ये. त्यांची घरे ही नारळाच्या झाडांपासून बनवलेली. आता मात्र त्यांना दर दोन-तीन वर्षांनी आपली नवी घरं उभारावी लागताहेत. सातत्यानं दुष्काळ आणि जमीन नापीक होत असल्यानं शेतीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. त्यामुळे अनेकांना उदर-निर्वाहासाठी समुद्रावर अवलंबून राहावं लागतंय. काही जण नारळशेतीकडे वळलेत. पण नारळाच्या झाडांनाही पर्यावरणातील बदलाची झळ पोहोचलीय. त्यांची उत्पादन-क्षमताही घसरलीय.

पर्यावरणातील बदलामुळे या देशा-भोवतालची समुद्राची पातळी मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे. पर्यावरण-तज्ज्ञांच्या मते, ग्लोबल वॉर्मिंगचा सगळ्यात जास्त फटका या देशाला बसत आहे. खुद्द राष्ट्राध्यक्ष एच. इ. अन्टोन टाँग यांनी, आपल्या देशातील नागरिकांना देश सोडायला सांगितलं आहे. त्यामुळे सध्या इथले नागरिक तरावा बेटावर जमा झाले आहेत. हे बेट बत्तीस स्क्वेअर किलोमीटर क्षेत्रफळाचं आहे. तरावाची लोकसंख्या पाच हजारांवर



**किरीबाती**

पोहचलीय. मुळात गरीब, त्यातच उत्पन्नाच्या साधनांचा संकोच झाल्यामुळे गुजराण होणं शक्य नसल्यानं अनेकांनी देश सोडलाय. टिशेएट हा त्यांच्यापैकी एक.

किराबासमधल्या जनतेसाठी सरकार काहीच करत नाही, असं कोणाला वाटू शकेल, पण तसं नाहीये. दुसरी टर्म असलेले टाँग यांनी, आपल्या देशातल्या समस्येकडे लोकांचं लक्ष जावं यासाठी बरेच प्रयत्न केलेत. किराबासच्या जनतेला देश सोडायला सांगण्यापूर्वी त्यांनी केलेले प्रयत्न खरंच महत्त्वपूर्ण आहेत. २०१२मध्ये तिथल्या सरकारमध्ये फिजी बेट विकत घेण्याचा प्रस्ताव संसदेत सादर केला होता. जेणेकरून किराबासमधील जनतेला तिथे हलवण्यात येऊ शकेल. मात्र तसं करण्यातल्या अडचणी लक्षात आल्यावरच राष्ट्राध्यक्षांनी लोकांना स्वतःहून देश सोडण्याचा सल्ला दिला. २००९मध्ये पर्यावरण बदलाला तोंड देणारे देश मालदीवमध्ये एकत्र आले. त्यानंतर पर्यावरण बदलामुळे ज्या देशांना अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं, त्याची दखल घेण्यासाठी २०१०मध्ये किराबास सरकारनं तरावा क्लायमेट चेंज कॉन्फरन्सचं आयोजन केलं. पण ही समस्या इतकी मोठी आहे, की जोवर मोठी आर्थिक मदत उभी होत नाही, तोवर हे प्रयत्न तोकडे पडणार याची जाणीव किराबास सरकारला झाली.

संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकारानं किराबास अडॉप्शन प्रोग्राम हाती घेण्यात आला आहे. त्याला वर्ल्डबँकेकडून निधी मिळतो. या कार्यक्रमानुसार किराबास सरकारकडून पर्यावरण बदलाच्या धोक्याला थोपवण्यासाठी जे प्रयत्न केले जात आहेत, त्याला सहकार्य मिळतं. पण हे प्रयत्न ठोस नाहीत. कारण अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला किंवा समुद्रकिनारी भिंती उभारण्यात आल्या. केवळ त्यामुळे पर्यावरण बदलाचा धोका टळलेला नाहीच, शिवाय समुद्रकिनारी कचरा साचून पाणी प्रदूषित झालं आहे. त्यातून रोगराई पसरण्याचे धोके आहेत. हे सगळंच टिशेएटनं म्हटल्याप्रमाणे भावी पिढीसाठी धोक्याचं आहे.

न्यूझिलंड हायकोर्टाकडे, टिशेएटनं स्वतःसह कुटुंबाला राहायला सुरक्षित ठिकाणच नाही, मग मी कुठे जाऊ, असा सवाल केलाय. मी आपल्या देशात परत जावं, असं तिथे काही नाही. मला काहीही भविष्य नाही; विशेषतः माझ्या मुलांसाठी, त्यांच्या आरोग्यासाठी. त्यामुळे आपल्याला इथेच राहू देण्यात यावं, अशी विनंती केली आहे. टिशेएट यानं यापूर्वी जेव्हा त्याचा वर्क व्हिसा संपल्यानं, त्याला मायदेशी जाण्याचा आदेश दिल्यानंतर, लवादाकडे आपली तक्रार मांडली होती. त्याच्या म्हणण्यात तथ्य आहे, असं लवादाने मान्य केलं होतं. त्याच्या जीविताला धोका आहे, पण त्याला निर्वासित घोषित करण्याची कोणतीही कायदेशीर व्यवस्था नाही, अशा शब्दांत असमर्थता व्यक्त केली होती. हाच धागा पकडून टिशेएटनं आपल्याला क्लायमेट रेफ्युजी जाहीर करावं, या मागणीसाठी हायकोर्टात याचिका दाखल केली.

टिशेएटनं न्यूझिलंड सरकारकडे केलेल्या याचिकेत, किराबासमधल्या भरतीच्या लाटांमुळे तिथली पिकं नष्ट झाली आहेत, तिथलंही पाणी दूषित झालंय. यामुळे देशात हिंसाचार उसळण्याच्या अनेक घटना वारंवार घडल्या आहेत, याकडेही लक्ष वेधलं आहे.

सध्या समुद्राच्या पाण्याची पातळी लोकांना धोका पोहचवण्याचइतकी झाली नसली तरी कायदेशीर उपायोजना आणि तिथल्या विस्थापितांसाठीच्या पुनर्वसनासाठी आतापासून प्रयत्न होणं गरजेच आहे. हवामानतज्ज्ञांनी जाहीर केलेल्या अंदाजानुसार, किराबासमध्ये शतक संपण्यापूर्वी एक मीटरपर्यंत समुद्राच्या पाण्याची पातळी वाढणार आहे. गेल्या काही वर्षांत इथल्या लोकांना दर तीन वर्षांनी आपलं घर बदलावं लागलं आहे. तिथल्या स्मशानभूमीत लावलेले दगडी स्मरणफलक जमिनीखालच्या हालचालींनं वरखाली झाले आहेत. इथल्या लोकांना आज ना उद्या आपल्याला इथून जावं लागणार या सत्याची जाणीव आहे. आपलं घर, देश सोडून जाण्याचं दुःख त्यांना आहे. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष एच. इ. अन्टोन टाँग यांनी, आपल्या देशातील नागरिकांना लोकांनी क्लायमेट रेफ्युजी म्हणून मान्यता द्यावी, अशी इच्छा जाहीरपणे व्यक्त केलीय. आपल्या देशातील नागरिकांना सन्मानानं जगता यावं. कोणालाही मायदेशातून इतर देशात राहताना जी वागणूक सहन करावी लागते, तसं त्यांच्या वाट्याला येऊ नये, यासाठी त्यांनी एका कार्यक्रमात जगभरातील देशांना आवाहन केलंय. जपानमधील एका संस्थेनं किराबासमधल्या लोकांच्या पुनर्वसनासाठी काही तरी करावं यासाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. पण त्याखेरीज त्यांच्या वाट्याला फार काही आलेलं नाही.

पर्यावरण बदलाबाबतची चर्चा आता वेगळ्या वळणावर येऊन ठेपली आहे. टिशेएटचे वकील मायकल किड यांनी त्याची बाजू मांडली, तेव्हा त्यांनी निर्वासितां-बाबतचे कायदे आता जुने झाले आहेत. किराबासमधल्या आपत्तीवर उपाय काढण्याइतकी मजबूत यंत्रणाही सरकार नाही, याकडे लक्ष वेधलंय. त्यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा होण्यास त्यामुळेच प्रारंभ झाला आहे.

संयुक्त राष्ट्रांनी दुसऱ्या महायुद्धानंतर तयार केलेले निर्वासितांचे कायदे आता बदलण्याची गरज आहे. कारण आता लोक



वर्ल्ड वॉर सेकंड गन्स तारावा, किरीबाती



किरीबाती आयलॅन्ड

मानवनिर्मित घटनांमुळे नाही तर निसर्गनिर्मित आपत्तीनं विस्थापित होत आहेत. किराबासमध्ये तर पुढच्या तीस वर्षांत जे घडेल त्याला आपण महाआपत्ती म्हणू शकतो. पुढच्या काही दशकांतच हा देश पाण्याखाली दिसेनासा होणार आहे. त्यामुळे तिथली माणसं मोठ्या प्रमाणावर इतर देशांमध्ये विस्थापित होतील, त्यामुळे अन्य देशांसाठीही या आपत्तीला तोंड देण्यासाठी नियोजन करावं लागणार आहे.

सध्या जरी किराबासमध्ये परिस्थिती शांत असली असली तरी हाताबाहेर जायला वेळ लागणार नाही. विशेष म्हणजे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात बराच कालावधी जाण्याची भीती असल्यानं आताच पावलं उचलण्याची वेळ आली आहे. संयुक्त राष्ट्रांकडे विस्थापितांबाबतचे सध्याचे कायदे आणि संबधित नियम हे १९५१मध्ये तयार करण्यात आले आहेत. तेही युद्ध किंवा युद्धसदृश परिस्थितीचा विचार करूनच तयार केलेले आहेत. त्यावेळी आजच्यासारखी पर्यावरणाबाबतची स्थिती नव्हती. त्यामुळे आता 'विस्थापित' या संकल्पनेत बदल करायला हवा, अशी अपेक्षा आंतरराष्ट्रीय स्तरावरून व्यक्त होतेय.

क्लायमेट रेफ्युजी नावाची गोष्ट अद्याप आंतरराष्ट्रीय कायद्यांमध्ये मान्यता मिळण्यास वेळ आहे. पण पर्यावरणामुळे परिणाम होऊन विस्थापित होणाऱ्यांची संख्या मात्र मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. २००२मध्ये पहिल्यांदा ब्रिटिश शास्त्रज्ञ नॉर्मन मायर यांनी, हा प्रश्न किती मोठं रूप धारण करू शकतो, याची कल्पना दिली होती. त्यांनी लिहिलेल्या एका लेखात ग्लोबल वॉर्मिंगमुळे २०५० पर्यंत एक कोटी लोक निर्वासित होतील, असं म्हटलं होतं. त्यानंतर झालेल्या चर्चेनंतर हा आकडा कदाचित सात कोटीही असू शकेल, असा अंदाज व्यक्त केला गेला होता.

अगदी आफ्रिकेचं उदाहरण द्यायचं झालं तर, जमिनीचं मोठ्या प्रमाणावर वाळवंटीकरण होत असल्यानं अनेकजण आपआपले देश सोडत आहेत. त्यामुळे पर्यावरणातील बदलाचा फटका बसल्यामुळे निर्वासित होणं ही जगापुढची मोठी समस्या ठरणार आहे. त्यावेळी भविष्यात मोठ्या संख्येनं पर्यावरणीय निवारा मागण्यासाठी वेगवेगळ्या देशांतील कोर्टांचे दरवाजे ठोठावले जातील. जरी एखाद्या देशातील कोर्टानं त्यांना तसा राहण्याचा अधिकार दिला तरी त्या व्यक्तीसाठी तेवढंच पुरेसं असणार नाही तर देशहितासाठी त्यांच्या गरजा पुरवणंही गरजेचं होईल. अन्य देशाच्या सुरक्षेला बाधा येण्यापर्यंतची स्थिती निर्माण होऊ शकते.

दक्षिण पॅसिफिकमधले न्यूझिलंड आणि ऑस्ट्रेलिया हे देश सगळ्यात जास्त विकास झालेले देश आहेत. सुदैवानं दोन्ही देशांनी पर्यावरण बदलामुळे विस्थापित होत असलेल्या लोकांच्या बाजूनं विचार सुरू केला आहे. ते पर्यावरण विस्थापित अशी संकल्पना कायद्यात समाविष्ट करण्याच्या तयारीत आहेत. पण त्याला बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. आजतरी फिनलंड आणि स्वीडन हे दोनच देश अशा प्रकारे पर्यावरणामुळे विस्थापित झालेल्यांना निर्वासित म्हणून निवारा देण्याची परवानगी देणारे विधेयक मंजूर केलेले देश आहेत. पण तिथेही या संदर्भातील प्रक्रिया अद्याप सुरू आहे.

गेल्या काही वर्षांत क्लायमेंट चेंज नावाच्या गोष्टीनं सारं जग धास्तावलं आहे. वादळं, भूकंप, पूर अशा आपत्तींनी हजारोंचे बळी घेतले आहेत. या नैसर्गिक आपत्ती तुमचा देश गरीब आहे की महासत्ता आहे, हे पाहून येत नाहीत. त्यामुळे एरवी सीमा, धर्म, दशहतवाद अशा गोष्टींनी व्यापलेल्या जगात पर्यावरण बदलाविरोधातला लढा सगळ्यांना मिळूनच लढायला हवाय. अशावेळी आठ जणांचं कुंटुंब असलेल्या टिशेएटनं दाखल केलेल्या याचिकेवर जर न्यूझिलंड सरकारनं त्याच्या बाजूनं निकाल दिला तर तो जगातला पहिला पर्यावरण विस्थापित म्हणून जाहीर केला जाणार आहे. सध्या तरी टिशेएटनं दाखल केलेली याचिकाच जगातल्या हजारो लोकांसाठी दिलासा देणारी आहे. कारण निर्सगाविरुद्ध लढाई ते जिंकण्याची शक्यता अगदीच कमी आहे. त्यामुळे टिशेएटने दाखल केलेल्या प्रकरणाचा निकाल त्याच्या बाजूनं लागो, ही प्रार्थना आपण करायला हवी.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# रेषांमध्ये खेळणारा व्यंगचित्रकार - विन्स

**प्रभाकर वाईरकर,** व्यंगचित्रकार



पन्नाशीचं दशक, भारतात स्वातंत्र्याची चळवळ अगदी टीपेला. फिरण्या-हिंडण्यासाठी तुरळकच साधने. टेलिफोन म्हणजे सामान्यांना वैभवाची खूण. रेडिओ होता पण तोही ठरावीकच उच्च व शहरी माणसांकडे. वर्तमानपत्राचाही तोच प्रकार... आतासारखी प्रसारमाध्यमे, प्रत्येकाकडे मोबाईल फोन, घराघरात टीव्ही-असंख्य वर्तमानपत्रे, मॅगेझिन्स नव्हती. त्यामुळे त्याकाळी जन्मलेली मुले, मनातल्या मनात कल्पनेच्या घोड्यावर आरूढ होऊन जग फिरायची, कधी वाटे... महात्मा गांधींच्या बरोबर गप्पा मारतोय, कोणाला वाटे अब्राहम लिंकनच आपला शेजारी, कुणा गावकुसाकडच्या कोकणातल्या मुलाला कधी काळी चाकरमान्याने हातावर ठेवलेला मुंबईच्या माहीमच्या हलव्याचा तुकडा पाहून वाटे की मुंबईत लोक दररोज मिठाई खात असतील. कावळ्या-चिमण्यांसारखे पंख असते तर दररोज दिल्ली किंवा मुंबईची सैर करता आली असती, तर काहींना वाटत असणार पंडित नेहरू शेजारी असतील तर...

परंतु त्याकाळचा एक मुलगा मात्र खराच नशिबवान ठरला. चक्क पंडित नेहरू त्याच्या हाकेच्या अंतरावर राहायचे. तसेच जर्मन, ब्रह्मी व अमेरिकन लोक शेजारीपाजारी, राजीव व संजय गांधी शाळा (श्रीमती गुबास जर्मन स्कूल) सुटल्याबरोबर खेळायला यायचे. पंडितजींच्या घरी गेल्यावर इंदिराजी चॉकलेट, कोल्ड ड्रिंक, बिस्किट्स यांचा खुराक द्यायच्या. पंडितजी मात्र सर्व मुले येताना व जाताना त्या प्रत्येकाला उंच उचलून गोड गोड पापा द्यायचे. अशा पंडितजींचा गोड पापा नेहमी ज्या मुलाला मिळायचा त्या मुलाचे नाव विजय नारायण सेठ... प्रसिद्ध व्यंगचित्रकार 'विन्स'.

१९४४ साली जन्मलेल्या विजयचे वडील स्व. लचमनदास सेठ भारताच्या अर्थमंत्रालयामध्ये उच्च अधिकारी होते. आई राजराणी सेठ गृहिणी होत्या. त्यांना दोन भाऊ आणि एक बहीण. अचानक १९५४ मध्ये त्यांच्या वडिलांची बदली मुंबईला झाल्याने ४ थीपासूनचे शिक्षण मुंबईला झाले.

अभ्यासामध्ये इतर कोणत्याही विषयात विन्स् याचा प्रभाव नव्हता. फक्त चित्रकला या विषयावर ते प्रेम करत. इतर कोणत्याही विषयामध्ये प्राविण्य नसल्याने आपला आवडता विषय चित्रकला यामध्येच भविष्य साकारावे असे वाटल्याने ते सर जे.जे. स्कूल आर्ट्समध्ये पेंटिंगच्या शाखेमध्ये प्रवेश करते झाले आणि उत्तमरीत्या डिप्लोमाचे हकदार बनले.

जे.जे. मध्ये असताना प्रो. शिरगावकरांनी परवानगी दिल्याने त्यांना मध्य-पूर्वेकडील देश आणि युरोपचा दौरा करता आला आणि प्रत्यक्ष मोठमोठ्या कलावंतांच्या कलेचा अनुभव घेता आला.

त्याच शिक्षणाच्या काळात आयुष्याला कलाटणी देणारी एक घटना घडली. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स व टाइम्स ऑफ इंडिया अगदी हाकेच्या अंतरावर आहेत. मारियो मिरांडा हे टाइम्स ऑफ इंडियामध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत होते. विन्सना ते महिन्यातून एकदा भेटण्यासाठी बोलावित आणि आपण कसे चित्र काढतो हे त्यांना दाखवत. त्यामुळेच मारियोंच्या केबिनमध्येच विन्स यांचे मन एखाद्या झऱ्याप्रमाणे खळखळत, अडखळत, नागमोडी वळणे घेत व्यंगचित्रकलेच्या सागराच्या भेटीसाठी आत्मिक ओढीने धावू लागले. त्यांचा हाच प्रवास आपापल्या कौशल्याने सुखकर करण्यासाठी अनेक संपादकांनी हातभार लावला. त्यामध्ये प्रसिद्ध संपादक राहुलसिंग (खुशवंतसिंग यांचा मुलगा) यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांनी विन्सना व्यंगचित्र कशी प्रभावी असावीत, त्यातील मर्म कसे मांडावे, कॅप्शन-चित्रकला-रचना कशी असावी यांचे अमोल मार्गदर्शन केल्याने पुढे विन्स हे व्यंगचित्रकलेच्या सागरामध्ये सुखनैव डुंबू लागले. तसेच शब्दविरहित व्यंगचित्रे रेखाटण्यासाठी 'सायन्स टुडे'चे संपादक सुरेंद्र झा यांचं विन्स यांच्या व्यंगचित्रकला कारकीर्दीत अनन्यसाधारण महत्त्व आहे.

विन्स यांच्या व्यंगचित्र रेखाटण्याच्या स्टाईलबद्दल विचार करताना असे वाटते की त्यांनी पेंटिंग्जचा जो अभ्यास केला त्याची सावली त्यांच्या व्यंगचित्रांमध्ये, रंग





भरण्याच्या पद्धतीमध्ये प्रकर्षाने जाणवते. रंग एका ठरावीक आकारात न भरता ते आपापल्या गुणधर्मानुसार एकमेकांत मिसळतात. काही रंग उठून पुढच्या रांगेत बसल्यासारखे वाटतात तर काही मुद्दामच मागच्या रांगेत बसल्यासारखे भासमान होतात, जसे पेंटिंगमध्ये भासतात तसे.

रेखाटन पद्धती भारतामधील कोणत्याही व्यंगचित्रकाराप्रमाणे नाही, काही पाश्चात्य चित्रकारांच्या शैलीचा प्रभाव त्यांच्यावर झालेला आढळतो. व्यक्तींच्या रेखाटन पद्धतीमध्ये साधारण शरीरयष्टी थोडीशी जाडजूड व चेहरा बारीकसा. परंतु चेहऱ्यावरचे हावभाव अगदी परिणामकारक. चित्रांमध्ये हालचाली अतिशय संथ, ॲक्शन कमीच, बोल्डनेसही कमी. ते रेखाटनाच्या शैलीमध्ये लाइन्सचा वापर एकामध्ये एक रेषा किंवा रेषांचा संच तयार करून एक जाडजूड रेषा तयार करतात. अनेक रेषांचा वापर करतात. स्केच केल्याप्रमाणे. म्हणजे व्यंगचित्रांमध्ये कमीत कमी रेषा असाव्यात. या अलिखित नियमांविरुद्ध त्यांची व्यंगचित्रे असतात. तरीही ती पहावीशी वाटतात. आनंद देतात... परिणाम साधतात.

रंगकाम करताना ते इंक व कलर पेस्टल्सचा वापर करतात तर पेन्सिलचा वापर ते टेक्स्चर निर्माण करण्यासाठी करतात. त्यामुळे चित्रे उठावदार दिसतात. कोणत्याही व्यक्तिरेखेमध्ये संपूर्णतया रंग भरत नाहीत. पाहिजे त्या ठिकाणीच रंग लावून इतर आकार मोकळा ठेवला तरी त्यामध्ये रंग असल्याचा भास निर्माण करतात.

विन्स यांनी राजकीय व्यंगचित्रांपेक्षा सामाजिक भान असलेली असंख्य चित्रे रेखाटली.

एका या व्यंगचित्रांमध्ये नेता भाषण करताना शांततेची कबुतरे उडवत आहे, परंतु ही नेतेमंडळी डबल-ढोलकी वाजवणारी कशी असतात हे दाखवण्यासाठी त्या व्यासपीठावर एक लहान मूल बुटांना पॉलिश करतो आहे हे विदारक खाबूगिरीचे सत्य त्यांनी अतिशय परिणामकारक मांडले आहे. हे चित्र पाहताना पेंटिंग पाहिल्याचा भास होतो व अचानक त्या लहान मुलांकडे लक्ष जाते व एकाच वेळी स्मितहास्य व तिरस्काराची भावना निर्माण होते. या चित्रामध्ये शब्दांचा वापर केलेला नाही. तरीही ते चित्र आपल्याशी संवाद साधते. ही विन्स यांची खुबी आहे.

दुसऱ्या एका व्यंगचित्रामध्येही शब्दांचा वापर केलेला नाही. दोन व्यक्तींमधील संभाषण चालू आहे. जी व्यक्ती समोरच्या ज्या व्यक्तीशी संभाषण करत आहे ती समोरची व्यक्ती मठ्ठपणे पाहत उभी आहे व सोबत त्याची बायको आहे. व्यक्तींचे संभाषण असंबद्ध दाखवण्यासाठी त्यांनी वेडेवाकडे बाण दाखवले आहेत, संभाषणाच्या बलूनमध्ये. तसेच परस्पेक्टिव्हचा वापर नियमाप्रमाणे केलेला नाही. मिनिएचर पद्धतीने एकाच पातळीत दुसऱ्या व्यक्तिरेखांची मांडणी केली आहे. कधी परस्पेक्टिव्हचा वापर करावा वा न करावा याचे स्वातंत्र्य ते चित्रांच्या योग्य परिणामकारकतेसाठी घेतात.

एका व्यंगचित्रामध्ये जोडपे आणि त्यांचे छोटे मूल ट्रॉलीमध्ये. ते मॉलमध्ये फिरतात... सर्वसाधारण मुले समोर दिसणाऱ्या वस्तूसाठी हट्ट करतात. रडून आकांडतांडव करतात. परंतु या छोट्याची तऱ्हाच वेगळी. हा छोटा समोरच्या बाईच्या पुतळ्याची किंमत विचारतोय. त्यासाठी संभाषणाच्या बलूनमध्ये बोधचिन्हाचा वापर केला आहे. त्यामध्ये त्यांनी कोड-बारचा वापर करून त्याची किंमत दर्शवण्याचा प्रयत्न



केला आहे. आई-बाबा यांच्याकडे नजर टाकली असता ते उच्च मध्यमवर्गीय कुटुंबाचे प्रतिनिधी वाटतात. अनेक रेषा असल्या तरीही चित्र देखणे वाटते. रंगांचा कमीत कमी आवश्यक तेवढाच वापर दिसतो. ते खट्याळ मूल आहे हे दर्शवण्यासाठी ते वस्तू ठेवण्याच्या ट्रॉलीमध्ये बसले आहे... मॉल आहे हे दर्शवण्यासाठी मॉलमध्ये सजावटीसाठी वापरण्यात येणारे 'स्टार' किंवा मार्गिका दाखवण्यासाठी छताला टांगलेला दिशादर्शक बाण... अशा एक-दोनच वस्तू दाखवून मॉलचा आभास निर्माण केला आहे.

विन्स यांची चित्रे पाहताना त्यातील अर्थ शोधावा लागतो. एका क्षणात ती लक्षात येत नाहीत. व्यंगचित्रे ही लक्ष वेधून व लक्ष खिळवून ठेवणारी असावीत या तत्त्वाशी बांधील असतात.

बोधचिन्हांचा वापर ते अनेक वेळा करतात. त्यामुळे ती 'सटल' वाटतात. जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातील व्यक्तीला आनंद देऊ शकतात. रेखाटन करताना डोळ्यांच्या ठिकाणी फक्त गोल आकार काढतात. कधीमधी त्यामध्ये बुबुळाचा ठिपका काढतात, तरीही त्यांचे डोळे प्रसंगानुरूप बोलतात. स्केची लाइन्स, तरीही गोलाकार असल्याचा भास निर्माण करतात. त्यांच्या व्यंगचित्रकलेचा आढावा घेताना त्यांनी जगाच्या पाठीवर जे काम केले आहे त्याचा आढावा घेणे क्रमप्राप्तच आहे.

त्यांची १९७८ पासून झुरिच स्वित्झर्लंड येथील साप्ताहिक 'ट्रेफक' Treffpunkt, या मॅगझीनमधून व्यंगचित्रे प्रसिद्ध झाली. १९७८ ते १९८३. त्यानंतर मारियो मिरांडांनी ओळख करून दिल्याने बाझेल येथील कार्टून म्युझियमने त्यांची ५ कार्टून्स विकत घेतली. १९९० साली १० व्या वर्धापन दिनासाठी त्यांना स्वीस येथील म्युझियमने बोलावले. स्वीस साप्ताहिक 'नेबल स्पालटर'ने १९८७ ते १९९१पर्यंत एका भारतीयाची प्रथमच व्यंगचित्रे प्रसिद्ध केली. अशा प्रकारे एक एक तार जुळत गेली आणि जर्मनी फ्रॅन्कफर्ट येथील प्रसिद्ध मॅगझीन EPD ने निमंत्रित केल्याने विन्स यांनी अनेक भारतीय व्यंगचित्रकारांना (वेगवेगळ्या भाषेत काम करणाऱ्या) आपापल्या व्यंगचित्रांसाठी युरोपचे दार उघडले. मराठीतील सुरेश सावंत, मी स्वत:, अरुण इनामदार, हसबनीस वगैरेंच्या व्यंगचित्रांना युरोप 'दाखवल्या'चे संपूर्ण श्रेय विन्स यांनाच जाते. विन्स यांची व्यंगचित्रे नॉर्वे, हॉलंड, जर्मनी, फ्रान्स, बेल्जियम, इटली या ठिकाणी प्रसिद्ध झाली. या काळात त्यांनी अनेक चढउतार पाहिले. १९९६ साली स्वित्झर्लंडमध्ये पुरस्कार मिळाला तर १९९० साली इडिनबर्ग (इंग्लंड) येथे आणखी एक मानाचा तुरा त्यांच्या शिरपेचात खोवला गेला. १९८७ साली त्यांनी स्विसमध्ये 'India in Switzerland' या कॉमिक फेस्टमध्ये इतर भारतीय व्यंगचित्रकारांबरोबर प्रत्यक्ष भाग घेतला.

कार्टुन्सव्यतिरिक्त ते सतत फोटोग्राफी व पेंटिंग करण्यामध्ये गुंतलेले असतात.

त्यांच्या आयुष्यात मनाला टोचणी लावणारी घटना सांगतात. ते म्हणतात, ''१९८९ मध्ये पेंग्विन प्रकाशनाने प्रकाशित केलेले 'Book of Indian Cartoonist' (संपादक स्व. अबू अब्राहम.) यामध्ये माझी पाच व्यंगचित्रे असून, लाज वाटेल एवढे कमी मानधन दिले गेले.''

'Eminant Cartoonists of India' या दूरदर्शनने तयार केलेल्या डॉक्युमेंटरीमध्ये विन्स यांच्यावर कॅमेरा ३० मिनिटे फिरला आहे.

बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्टूनिस्ट या संस्थेच्या राष्ट्रीय सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी २००२ साली त्यांची निवड झाली.

त्यांची सुविद्य पत्नी कुचीपुडी नृत्याचे धडे मुंबई विद्यापीठातून देत असते तर कन्या इव्हेंट मॅनेजमेंटच्या क्षेत्रात कार्यरत आहे. असे हे फिरंगी दिसणारे, सतत विनोदी बोलणारे, हसतमुख, दुसऱ्यांना नेहमीच मदत करणारे विन्स आज ६९ वर्षांचे झाले आहेत.

परदेश व भारतामध्ये अनेक संस्थांशी त्यांचे नाते जोडलेले आहेच. १९६३ पासून मुक्त व्यंगचित्रकार म्हणून इतका लांब पल्ल्याचा प्रवास करताना त्यांच्या मनात विचार येतात की कोणत्याही कलाकाराचे त्याच्या कलाकृतीतून निर्माण होणारे समाधान हे अमूर्त असते. मनामध्ये सतत आयुष्यातील अनेक प्रसंगांच्या प्रतिमा घोळत असतात त्यामुळे मन कधीच स्वस्थ बसत नाही. ते म्हणतात, ''मी माझ्या भिंतीवर टांगलेल्या आरशाला विचारतो, जगामध्ये सर्वात श्रेष्ठ व्यंगचित्रकार कोण... आरसा हसतो... आरसा कोरा, पुसल्यासारखा होतो... तिसऱ्या पिढीतील नवीन वर्गातील मुले येतील... पुन्हा आरसा आणतील आणि त्यालाही तोच प्रश्न विचारतील... उत्तर वेगळे असेल?... सच्चा व्यंगचित्रकार किंवा व्यंगचित्रांवर मनापासून प्रेम करणाऱ्या माणसाने जरी नवीन आरसा आणला तरीही त्याला उत्तर मिळेल काय...!

**– प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# 'महाराष्ट्र दगडांचा नव्हे, समृद्ध वारशाचा देश' – डॉ. दाऊद दळवी

**सपना कदम – आचरेकर**

''महाराष्ट्र हा भारतातील समृद्ध प्रदेश होता. तो दगडांच्या देश म्हणावा असा कधीही दरिद्री नव्हता आणि सुदैवाने आजही नाही. म्हणूनच या प्रदेशाला फार मोठी सांस्कृतिक परंपरा लाभली.'' अशा शब्दांत इतिहास संशोधक डॉ. दाऊद दळवी यांनी महाराष्ट्राच्या संपन्नतेविषयीच्या सर्वसाधारण समजुतीला छेद दिला. 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन', 'सानेकेअर ट्रस्ट' आणि 'ग्रंथाली' यांच्या विद्यमाने आयोजित 'माधवबाग कृतार्थ मुलाखतमाले'च्या दुसऱ्या पर्वात दादर – माटुंगा सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात डॉ. दळवी यांची मुलाखत झाली. दाऊद दळवी यांनी राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काही महाविद्यालयांतून काम केले. ते ठाण्याच्या ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून निवृत्त झाले. त्यांची मुलाखत कॉर्पोरेट अधिकारी व तंत्रसल्लागार चंद्रशेखर नेने यांनी घेतली. दळवी यांनी मुख्यत: महाराष्ट्रामधील लेण्यांच्या रूपातील समृद्ध इतिहास उपस्थितांसमोर उलगडला.

दळवी म्हणाले, की ''महाराष्ट्राच्या इतिहासाला सर्वसाधारणपणे छत्रपतींच्या काळापासून सुरुवात केली जाते. त्यामुळे त्याआधीच्या महाराष्ट्रत काहीच नव्हते, तो वैराण प्रदेश होता, अशी समजूत रूढ झाली आहे. पण या भूमीचा खरा इतिहास जाणून घेण्यासाठी इसवी सनाच्याही काही दशके मागे जावे लागेल. सातवाहन हा वंश जवळजवळ साडेचारशे वर्षे अव्याहतपणे महाराष्ट्रात राज्य करत होता. सातवाहन राजांनी समृद्ध राज्यकारभार केला. त्यावेळी महाराष्ट्राचा व्यापार युरोपात रोमपर्यंत चाले. ग्रीक व रोमन संस्कृतीच तेथे प्रबळ होत्या.'' ते पुढे म्हणाले की, ''देशातील एकूण बाराशे लेण्यांपैकी आठशे महाराष्ट्रात आहेत. येथे मिळणारा बसाल्ट हा अग्निजन्य दगड हे त्याचे एक कारण आहे. त्या दगडात कोरलेली लेणी ही शाश्वत स्वरूपाची आहेत. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिक सुबत्ता. ती असल्याशिवाय लेणी तयार केली गेली नसती.''

दाऊद दळवी यांना शालेयजीवना–पासून इतिहासाची आवड होती. त्यांनी इतिहास आणि राज्यशास्त्र या विषयांतून पदवी मिळवली. त्यावेळी पुरातत्व शास्त्रासाठी विद्यापीठामध्ये विशेष विभाग नव्हता. पण एका छोट्याशा घटनेमुळे ते गडकिल्ले, लेणी यांच्या रूपातील सांस्कृतिक वारशाच्या अभ्यासाकडे वळले. ते घारापुरीची लेणी पाहत असताना महिला मार्गदर्शक त्या लेण्यांविषयी चुकीची माहिती देत असल्याचे दळवी यांच्या लक्षात आले. ते पाहिल्यानंतर त्यांना वाटू लागले, की हा एवढा प्रचंड वारसा आहे, त्याची कुठेतरी नोंद केली गेली पाहिजे. ती राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत, व्यक्तीपर्यंत पोचली पाहिजे. अशा प्रकारची नोंद असलेली पुस्तके मराठीत/इंग्रजीतदेखील जवळजवळ नाहीत. मग त्यांनी स्वत:च त्या विषयावर लिहिण्याचे ठरवले.

त्यानंतर दाऊद दळवी यांनी चौदा वर्षे सातत्याने महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची, लेण्यांची माहिती जमवली. त्यातून 'लेणी महाराष्ट्राची' हा ग्रंथ साकारला. ('ग्रंथाली'नेच तो प्रसिद्ध केला आहे. त्याची नवी आवृत्ती अधिक माहितीसह लवकरच प्रकाशित होणार आहे.) ज्या काळात इंटरनेट, मोबाइल यांसारखी माहिती मिळवण्याची आधुनिक माध्यमे उपलब्ध नव्हती त्या काळात त्यांनी ते शिवधनुष्य कसे पेलले, याविषयी सांगताना दळवी म्हणाले, ''महाविद्यालयात असताना कामानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास होत असे. ज्या ठिकाणी जायचे त्या परिसरातील लेण्यांची माहिती मी आधीच काढून ठेवत असे. काम संपल्यानंतर त्यांचा पाठपुरावा करत असे. पुस्तक लिहायचे असेल तर माहितीची विश्वासार्हता महत्त्वाची असते. त्यासाठी संशोधन केले. संशोधनाच्या जोडीने संदर्भ जमा केले. संदर्भांचा व्यासंगाने अभ्यास केला. हे सर्व करताना या लेण्यांविषयीचा माझा दृष्टिकोन अधिक प्रगल्भ झाला. एशियाटिक लायब्ररी आणि विद्यापीठाचे समृद्ध ग्रंथालय ही संदर्भस्थाने माहिती मिळवण्यासाठी उपयोगी ठरली. इतर ग्रंथालयांचीही मदत झाली. पाश्चात्यांनी लिहिलेली पुस्तके अभ्यासली.

त्या पुस्तकांत दिलेली माहिती आणि वस्तुस्थिती यांमध्ये तफावत असल्याचे लक्षात आले. उदाहरणार्थ, अजिंठा आणि वेरूळ येथे वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती आहेत. ती लेणी एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला किंवा अखेरीस प्रकाशात येऊ लागली. पाश्चात्य अभ्यासकांनी लेण्यांच्या बाह्य रचनेवरून त्यांची माहिती लिहिली. पण त्यांना एखादी मूर्ती नेमकी कोणत्या देवतेची आहे, तिची आभूषणे काय आहेत, या प्रकारची माहिती असणे शक्य नव्हते. ती सर्व माहिती जाणून घेण्यासाठी मी आपले सर्व ग्रंथ, मूर्तिशास्त्र याविषयीची पुस्तके वाचून लेण्यांचे वर्गीकरण केले.''

लेण्यांच्या परिसरातील नागरिकांनाही त्या लेण्यांविषयी माहिती नसते. त्याबद्दलची जागरूकता तर अजिबात नाही. त्यामुळे सर्रास अनेक लेण्यांची ओळख पांडवलेणी म्हणून करून दिली जाते. दळवी यांनी असे गैरसमज दूर करण्यासाठी ग्रंथनिर्मितीचा उपक्रम हाती घेतला. त्या अभ्यासातून लेण्यांच्या रंजक माहितीचा खजिना त्यांना सापडला. कृतार्थ मुलाखतीच्या रूपाने उपस्थितांना ते इतिहासाची अद्भुत सफर घडवत होते. महाराष्ट्रातील लेण्यांच्या उदयाविषयी ते म्हणाले, ''बौद्ध भिक्षूंमुळे महाराष्ट्रात लेण्यांची परंपरा निर्माण झाली. लेणी हा शब्द 'लयन' (खोदून केलेली गुहा) या संस्कृत शब्दावरून रूढ झाला आहे. महाराष्ट्रातील पहिली लेणी कोणती याबाबत अधिकृतरीत्या सांगता येत नाही. त्यांच्या शैलीवरून त्यांचा क्रम ठरवावा लागेल. त्यानुसार कार्ला-भाजा येथील लेणी पहिली मानण्यात येतात. लेण्यांची परंपरा दक्षिण बिहारमध्ये किंवा प्राचीन काळातील मगध प्रांतामध्ये जास्त दिसून येते. तेथे पहिल्या-प्रथम बुद्धाच्या समकालीन आणि थोड्या नजिकच्या काळामध्ये आजीवक नावाचा पंथ होता. त्या पंथातील लोक संन्यस्त होते. ते वनामध्ये वास्तव्य करत. वर्षभर ते भ्रमंती करत. पावसाळ्यात मानवी वस्ती-पासून दूर राहत. त्यांच्या राहण्याची सोय




व्हावी म्हणून अजातशत्रू राजाने पहिली लेणी तयार करवून घेतली. त्या लेण्यांना 'वर्षावास' असे म्हटले जात असे. नंतर ती सांस्कृतिक केंद्रे बनली. महाराष्ट्रातील लेणी खोदण्याची जी परंपरा आहे ती बिहारमधील नागार्जुन टेकड्या किंवा लोमेश ऋषींची लेणी किंवा सोनभांडार या जांभा दगडातील लेण्यांच्या समूहाशी साधर्म्य असणारी आहे.''

बौद्ध लेण्यांविषयी अधिक माहिती देताना दाऊद दळवी यांनी सांगितले, की ''सुरुवातीच्या काळात हीनयान पंथ होता. त्या पंथात बुद्धाला देव म्हणून पुजलेले नाही. त्याला समाजातील एक श्रेष्ठ मनुष्य, ज्याने केवळ ज्ञान प्राप्त केले आहे असा प्रबुद्ध मानलेले आहे. हीनयान पंथाच्या लेण्यांमध्ये त्याच्या प्रतीकांचे पूजन केलेले दिसते. भाज्याचे लेणे किंवा बेडशाचे लेणे ही अशा लेण्यांची उदाहरणं आहेत.

''कुशाण वंशाच्या लोकांनी भारतावर पहिल्या शतकात आक्रमण केले. त्यांचा राजा कनिष्क याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याने बुद्धाची प्रतिमा प्रथम निर्माण केली. परंतु कनिष्क मध्य-पूर्व आशियातून आलेला असल्याने त्याने तयार केलेल्या प्रतिमेत ग्रीक ठेवणीचा चेहरा आणि भारतीय पद्धतीची उत्तरीय असे 'फ्युजन' पाहण्यास मिळते. त्यानंतर बुद्धप्रतिमांची प्रथा भारतात आली आणि ती लोकांना भावू लागली. लोक बुद्धाचा दैवत म्हणून स्वीकार का करू नये असा विचार करू लागले. त्यातून महायान पंथ निर्माण झाला. कार्ल्याचे मूळ लेणे हे हीनयान पंथीय आहे, पण त्याचा बाहेरील भाग हा महायानपंथीय आहे. कान्हेरीचा क्रमांक तीनचा स्तूप हा मूळचा हीनयान आहे पण नंतर महायानांनी त्यावर काम केले. बुद्धाची जवळजवळ एकवीस फुटांची प्रतिमा तेथे आहे. ती लेणी जरी दोन वेगवेगळ्या पंथांची असली तरी कोणत्याही पंथातील व्यक्ती कुठेही जात असे. तशी पंथसहिष्णुता होती.''

दाऊद दळवींनी अशी माहिती दिली, की म्हणाले, ''प्राचीन भारतातील राज्यकर्ते हे प्रजाभिमुख होते. बहुजन हिताय, बहुजन सुखाय हा त्यांचा राजधर्म होता. त्यांनी कोरलेल्या लेण्यांमध्ये आलेख आहेत. राज्य कसे असावे, राजांची उद्दिष्टे काय असावीत याबाबत उल्लेख त्या आलेखांमधून आढळतो. देवी लेण्यातील आलेखावरून सातकर्णी राजाच्या गौतमी परश्री या सात्त्विक राणीची माहिती मिळते. कार्ल्याच्या लेण्यमधील आलेखांमधून ते लेणे कशासाठी कोरले, त्यासाठी कोणी दान दिले हे समजते. दुर्दैवाने ब्राह्मणी लेण्यांमध्ये अशा प्रकारचे आलेख सापडत नसल्याने अनेक महत्त्वाच्या गोष्टी प्रकाशात येऊ शकलेल्या नाहीत.''

भारतातील बहुतेक लेणी राजांनी किंवा त्यांच्या मंत्र्यांनी बांधलेली नसून लोकांनी त्यांच्याकडील पै पै दान देऊन

बांधली आहेत. त्याकाळच्या सामाजिक जाणिवेचे आणि सहकार्याचे ते उत्तम उदाहरण आहे, असे दळवी यांनी सांगितले.

दळवी यांनी भारतीय लेण्यांवरील परकीय प्रभावाची रंजक माहितीही दिली. ''त्या काळात पश्चिमेकडून व्यापारासाठी लोकांची ये-जा होत असे. आपल्या देशातील लोकही परदेशात जात असत. व्यापार-उदीम आणि संस्कृती यांची सुंदर देवाणघेवाण त्या काळात सुरू होती. पितळखोऱ्यातील लेण्यांमधील दोन प्रतिहारींच्या (सुरक्षा-रक्षकांच्या) शिल्पांतील गणवेश आणि शिरोभूषणे परकीय धाटणीची आहेत. किंवा तेथील हत्तींच्या शिल्पांची ठेवण लक्षात घेतली तर त्यावरचा परकीय प्रभाव दिसून येतो.''

बौद्ध भिक्खू जल आणि खुष्कीचा अशा दोन मार्गांनी परदेशात गेले. काही भिक्खू खुष्कीच्या मार्गाने अफगाणिस्तान, इराणमध्ये गेले आणि तेथून सिल्क रूटने मध्य आशियात गेले. मध्य आशियातील उंटावर बसलेला बुद्ध किंवा चीनमधील तुवांग उवांगमधील भित्तिचित्रे हे त्या मार्गाने घडून आलेल्या सांस्कृतिक अभिसरणाची उदाहरणे होत. भारतीय लोक समुद्र ओलांडून जाणे महापातक मानत असत असा आपला समज आहे, पण जातककथांमध्ये आणि प्राचीन ग्रंथांमध्ये त्या काळात अनेक लोक, विशेषत: बौद्ध भिक्षू समुद्रमार्गाने परदेशात गेल्याचे संदर्भ आहेत.''

कातळशिल्प हा डॉ. दळवी यांच्या संशोधनातील महत्त्वाचा विषय. त्यांनीच आदिमानवांच्या या कलाकृती कोकणातून शोधून काढल्या. ते म्हणाले, ''कातळशिल्प हा प्रकार फार कुणाला माहीत नाही. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा आणि अगदी कर्नाटकापर्यंतच्या भागात समुद्रालगत कातळ आहे. तो कातळ मैल-मैल पसरला आहे. त्या भागात राहणाऱ्या आदिम मानवांनी कातळावर अशा प्रकारची चित्रे, प्रतिमा कोरल्या. त्यात प्राणी, पक्षी आहेत. त्यावरून तत्कालीन मानव आपली सत्ता पशुपक्ष्यांवर असल्याचे सांगू पाहत असावा. राजापूरजवळ बावन्न फूट मोठे कातळशिल्प आहे. दोन पट्टेरी वाघांच्या मध्ये माणूस असे ते शिल्प आहे. काही चित्रांचा अर्थ लागत नाही. त्यावर मी आणि माझे सहकारी संशोधन करत आहोत.''

तत्कालीन मानवी जीवनाची आणि संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या त्या कातळशिल्पांचे जतन व्हायला हवे. महाराष्ट्राचा तो जागतिक दर्जाचा ठरेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

सांकृतिक वारशाविषयीचे लोकांचे अज्ञान आणि इतिहासाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन यांमुळे लेणी, गड-किल्ले, कातळशिल्पे यांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होत आहे. शासनाने त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. मात्र लोकांनीही केवळ शासनावर अवलंबून न राहता लोकसहभागातून त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, ही बाब दळवी लक्षात आणून देतात. त्याच भावनेतून त्यांनी 'कोकण इतिहास परिषद' निर्माण केली आहे असे ते म्हणाले.

त्यांनी इतिहासाच्या शैक्षणिक अभ्यासक्रमातील त्रूटींकडेही लक्ष वेधले. ''आपल्याकडे इंग्लंडचा इतिहास, युरोपचा इतिहास, चीन-जपानचा इतिहास शिकवला जातो, पण महाराष्ट्राचा इतिहास शिकवला जात नाही. मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात महाराष्ट्राचा इतिहास येण्यास १९८६ साल उजाडावे लागले. स्थानिक इतिहासाला महत्त्व दिले गेले पाहिजे. प्रत्येक तालुक्याचा, प्रत्येक जिल्ह्याचा प्रमाणभूत इतिहास लिहिला गेला पाहिजे. तो प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोचवला गेला पाहिजे. त्यामुळे त्यांना स्थानिक संस्कृती कळेल आणि मग त्यांचे देशाविषयीचे प्रेम उचंबळून येईल.'' अशा उद्‌बोधक विचारांनी दाऊद दळवी यांनी मुलाखतीचा समारोप केला.

**– सपना कदम –आचरेकर**
sapanakadam34@gmail.com

# कॅन्सर वातावरणात आहे; प्रतिकारसज्ज राहणे हाच उपाय – डॉ. पटेल

## दिनकर गांगल

कॅन्सर आपल्याभोवती वातावरणात, पर्यावरणात आहे. त्याला रोखण्याचा उपाय एकच, तो म्हणजे प्रत्येक व्यक्तीने स्वत:ची प्रतिकारशक्ती वाढवणे. एकदा त्या रोगाने ग्रासले, की त्याला व्यक्ती विविध उपायांनी काबूत ठेवू शकते, पण त्या रोगाची टांगती तलवार सतत डोक्यावर राहते, तेव्हा उत्तम उपाय म्हणजे रोगास दूर ठेवणे, असे उद्‌गार डॉ. चंद्रकांत पटेल या ज्येष्ठ कॅन्सरतज्ज्ञाने 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन', 'सानेकेअर ट्रस्ट' आणि 'ग्रंथाली' यांच्या विद्यमाने आयोजित 'माधवबाग कृतार्थ मुलाखतमाले'मधील त्यांच्या प्रकट संवादात काढले. कॉर्पोरेट सल्लागार व अभ्यासक चंद्रशेखर नेने यांनी त्यांची मुलाखत घेतली.

ते म्हणाले, की कॅन्सर किंवा आधुनिक वाटणारे रोग नव्याने निर्माण झालेले वा पसरलेले नाहीत. पूर्वी माणसांचे सरासरी आयुष्य पंचवीस-तीस वर्षे असे. बालमृत्यूच प्रचंड असत, त्यामुळे त्या रोगांचे अस्तित्व जाणवत नसे. आधुनिक काळात माणसाचे सरासरी आयुर्मान पन्नास-साठच्या पुढे गेले आहे, त्यामुळे रोग दृगोचर होतात, इतकेच.




डॉ. पटेल यांनी बोलण्याच्या ओघात व श्रोत्यांच्या प्रश्नांना अनुलक्षून एकूण आरोग्यसेवेबाबत, विशेषत: कॅन्सरबाबत बरीच माहिती दिली. ते म्हणाले, की वैद्यकीय शिक्षण स्वस्त झाल्याखेरीज उत्तम आरोग्यसेवा सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात येणार नाही; अर्थात अनेक सेवाभावी संस्था व तशाच वृत्तीचे डॉक्टर गरिबांसाठी तऱ्हतऱ्हेने वैद्यकीय मदत करत असतात हेही त्यांनी नमूद केले.

डॉ. पटेल यांनी सांगितले, की त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या आईवडिलांचा मृत्यू झाला, म्हणून त्यांनी डॉक्टर व्हायचे ठरवले. त्याच कारणाने त्यांनी जरी इंग्लंड-अमेरिकेत शिक्षण घेतले, तेथे नोकरी-व्यवसाय केला तरी भारतात परत येण्याचे ठरवले.

डॉ. पटेल पूर्वीचे सावंत-भोसले. त्यांचे आडनाव त्यांच्या आजोबांच्या काळात बदलले गेले. आजोबांना ब्रिटिश सरकारात पुरस्कार मिळाला. ते तो स्वीकारण्यास गेले तेव्हा ब्रिटिश अधिकारी म्हणाला, की सावंत म्हटले की खंडीभर लोक उभे राहतील, त्यातून तुम्हाला ओळखणार कसे? तर चंद्रकांत पटेल यांचे आजोबा म्हणाले, मग मला पटेल म्हणा! डॉ. पटेल यांनी ऐतिहासिक आढावा घेताना असेही सांगितले, की ते मूळ राजपूत. त्याचे पूर्वज त्या प्रदेशातून सावंतवाडीला चार शतकांपूर्वी स्थलांतरित झाले.

डॉ. पटेल डॉ. बावडेकर यांच्या समवेत गोंदवल्याच्या ब्रह्मचैतन्य संस्थानात वैद्यकीय सेवा करण्यास जात. त्या संदर्भात ते म्हणाले, की आरंभी तो उपक्रम सेवाभावी रीतीने उत्तम चालला. नंतर तेथे देणग्या मिळू लागल्या व शहरभागातील श्रीमंत रुग्णदेखील विनामूल्य सेवा घेऊ लागले. सुरुवातीला तेथे डॉक्टर उपलब्ध नसत, परंतु आता तेथे मानवसेवी डॉक्टरांची 'वेटिंग लिस्ट' आहे. एवढे ग्लॅमर उपक्रमास लाभले आहे. तरीदेखील परिसरातील गरीब रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्याचा तो चांगला उपक्रम म्हटला पाहिजे.

डॉ. पटेल यांनी गडकिल्ल्यांना भेटी देण्याचा व तेथील छायाचित्रे टिपण्याचा छंद जोपासला. त्यांनी प्रतापगड, सिंहगड, रायगड , पाचाड येथील स्वतः घेतलेल्या विविध स्लाइडर्समधून, रोचक माहिती देत, श्रोत्यांना शिवकालीन इतिहासात नेले त्यांच्या अशा जुन्या ट्रान्स्परन्सीज कार्यक्रमात पडद्यावर दाखवल्या तेव्हा प्रेक्षक नॉस्टॅल्जियाने मोहरून गेले. डॉ. पटेल यांनी गडकिल्ल्यांच्या प्रत्येक फोटोची माहिती आणि त्यांची आठवण उपस्थितांना कथन केली. पडद्यावर काटेरी आकाराची एक वस्तू दाखवून ते म्हणाले, की शिवाजींच्या काळात शत्रूवर हल्ला करण्यासाठी लोखंडाची काटेरी आकाराची वस्तू वापरली जात असे. त्याचे काटे धोत्र्याच्या विषात बुडवून शत्रूच्या मार्गात टाकले जात. ती वस्तू म्हणजे टेट्रापॉड. तो काय असतो, हे लोकांना समजावे म्हणून तो पडद्यावर दाखवला गेला. डॉ. पटेल पुढे म्हणाले, की प्रत्यक्षात तो टेट्रापॉड नसून एका डॉक्टरने काढलेला किडनी स्टोन आहे. ते ऐकताच एवढा वेळ उत्कंठेने तो फोटो पाहणाऱ्या प्रेक्षकांमध्ये हास्याची खसखस पिकली.

डॉक्टरांनी फोटोंची माहिती देताना, अशा तऱ्हेने थोड्याफार मिश्किल शैलीने प्रेक्षकांची करमणूक केली. अनेक दशकांपूर्वी घेतलेल्या त्या फोटोंबद्दल बोलत असताना डॉक्टरांच्या वयाच्या एकोणऐंशीव्या वर्षीही शाबूत असलेल्या दांडग्या स्मरणशक्तीचा प्रत्ययही येत होता. डॉक्टरांनी कार्यक्रम संपल्यावर उपस्थितांकडून विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. कर्मयोगी वृत्ती, साधेपणा आणि विनम्रता, तसेच गरिबांचा कळवळा ह्या डॉ. पटेल यांच्या स्वभावगुणांचे या मुलाखतीमधून श्रोत्यांना दर्शन झाले.

'माधवबाग कृतार्थ मुलाखतमाले'च्या संयोजक संध्या जोशी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पटेल यांच्या हस्ते अनुराधा गोरे यांच्या 'परीक्षेची भीती कशाला?' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले (प्रकाशक ग्रंथाली). किरण क्षीरसागर यांनी 'थिंक महाराष्ट्र' प्रकल्पाची माहिती निवेदन केली.

**'माधवबाग कृतार्थ मुलाखतमाले'चा पुढील कार्यक्रम १८ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता होईल. दादर-माटुंगा कल्चरल सेंटर इथे होणाऱ्या कार्यक्रमात आकाशवाणीवरील 'पुन्हा प्रपंच' यासारख्या कार्यक्रमां-मधून श्रोत्यांवर स्वतःच्या आवाजाची मोहिनी टाकणाऱ्या बाळ कुडतरकर यांच्याशी संवाद साधला जाणार आहे.**

**- दिनकर गांगल**
thinkm2010@gmail.com

# वसईचा साहित्य-कला महोत्सव

**मनोज आचार्य**

गेली अनेक वर्षं, वसई परिसरात सातत्यानं सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात अग्रणी असणाऱ्या सहयोग या संस्थेनं, वसई पश्चिमेला असणाऱ्या भुईगाव-डोंगरी परिसरातील संस्थेच्या निसर्गरम्य आवारात नुकतंच 'वसई साहित्य कला महोत्सव'चे अतिशय साधेपणानं तरीही उत्कृष्ट असे आयोजन केलं होतं. महोत्सवाचे हे तिसरं वर्ष. हा कार्यक्रम पूर्ण दिवसाचा, चार सत्रांचा होता.

प्रथम सत्र उद्घाटन सोहळ्याचं होतं. नामवंत पत्रकार, लेखक, संपादक दिनकर गांगल व मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार यांच्या हस्ते उद्घाटन झालं. त्यानंतर संस्थेचे सर्वेसर्वा आणि कवी सायमन मार्टीन यांनी प्रास्ताविक केलं. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेचा सामाजिक दृष्टिकोन व कला महोत्सवाचा उद्देश विशद करताना आजच्या युगात आपली संस्कृती, आपल्या परंपरा, आपली भाषा, आणि आपला सामाजिक धर्म यांच्याबद्दलचा आपला अभिमान बोथट झाला आहे. असं सांगत स्वधर्म, स्वभाषा आणि संस्कृती या गोष्टींचा जिथे अभाव असतो, तिथे राजकीय दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, सांकृतिक, मानसिक आणि भावनिक दृष्ट्यादेखील आपण कोणती स्थिती ओढवून घेतो, हे काही मौलिक उदाहरणं देत पटवून दिलं. त्यानंतर ते म्हणाले, साहित्य आणि कला माणसांचं जगणं सुंदर बनवतात. साहित्य मुक्तीकडे जाण्याचा मार्ग दाखवतं. आणि त्याचवेळेस दुःखाच्या कारणांचा वेधदेखील घेतं. आज प्रचंड प्रमाणात वाढणाऱ्या सिमेंटच्या जंगलात विचारांची





हिरवळ टिकवून ठेवण्यात आपण अपयशी ठरलो, तर काही व्यक्तींचे चेहरे उजळावेत म्हणून, विकासाच्या नावाखाली होणारी माणसांची आणि त्यांच्या विचारांची कत्तल चालूच राहील. या अनागोंदीबद्दल बोलण्याची शक्ती फक्त साहित्यच माणसाला देतं म्हणून अशा महोत्सवांची आणि आपल्या उपस्थितीची मोठी गरज आहे. त्यांच्या त्या प्रामाणिक, भावनिक आवाहनानं प्रचंड संख्येनं उपस्थित असलेला रसिकवर्ग भारावून गेला.

दिनकर गांगल यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलताना प्रारंभी सायमन मार्टीन यांच्या भान जागवणाऱ्या वाणीचं मनापासून कौतुक केलं. त्यानंतर लोक चळवळी नष्ट होत आहेत का, या विषयी बोलताना ते म्हणाले, देशभरात उमेद आणि जगण्यावरचा विश्वास वाढवणाऱ्या अनेक घटना घडत आहेत.आजही नवनिर्माणाचं काम छोट्या-मोठ्या पातळीवर जोमानं सुरू आहे.मात्र त्या बातम्या आपल्यापर्यंत पोचत नसल्यानं आपल्याला आधारहीन झाल्यासारखं वाटत आहे. आंदोलन आणि चळवळी कधीही संपणार नाहीत, तर त्या वेगवेगळ्या स्वरूपात सुरूच राहतील. ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले, गडचिरोली जिल्ह्याचं नाव आपण केवळ नक्षलवादाशी जोडत असतो. मात्र तेथील मेंढालेखा नावाच्या पाचशे लोकवस्तीच्या गावानं जंगलावरचा आपला अधिकार किती चिवट लढा देऊन मिळवला हे आपल्याला माहीतच नसतं. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार अमलात आलेल्या 'पेसा' कायद्याची योग्य अंमलबजावणी झाली नाही. २००६ मध्ये आदिवासींसाठी वनहक्क कायदा संमत करण्यात आला. हा आपल्या देशातील एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याची अंमलबजावणी गडचिरोलीतील मेंढालेखा गावात झाली. या गावानं बांबू वाहतूक परवाना ग्रामसभेला मिळवण्यात यश



मिळवल्यानं 'आमच्या गावात आमचं सरकार' ही पद्धत रुजू करताना, बांबूच्या विक्रीतून आलेल्या पैशांतून देशांतली श्रीमंत ग्रामपंचायत होण्याचा विक्रम करून दाखवला आहे. असा परवाना मिळवणारं ते देशातलं पहिलं गाव ठरलं.

या अधिकारांमधूनच जंगलसंवर्धनाला चालना मिळण्याची आशा आहे. पण अशा चळवळीची बातमी अभावानंच जनतेपर्यंत पोचते. अशा रीतीनं आदिवासींच्या जमिनींचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला, तर नक्षलवादी चळवळीला चांगलं उत्तर मिळेल. आदिवासी भागातील लोकांना मार्क्सवाद काय आहे, हे माहीत नाही. जमीन, खनिजसंपत्तीसाठी जमिनीचं उत्खनन व जंगलावरची मालकी हे आदिवासींचे तीन मूलभूत प्रश्न आहेत. ते सोडवल्यास नक्षलवादाचा प्रश्न निश्चितच सुटेल. जेथे नक्षलवादी चळवळ नाही त्या भागात अशी उपाययोजना केल्यास त्याला चांगला प्रतिसाद मिळेल, याची मला खात्री आहे. देशातील आजच्या परिस्थितीविषयी बोलताना म्हणाले, सध्या असं चित्र निर्माण झालेलं आहे की सर्वत्र फक्त बलात्कारच होत आहेत. अशा बातम्यांमुळे आपल्यालाही तुटल्यासारखं वाटतं. नेता नसलेल्या या काळात प्रत्येकानं आपला अंतर्नाद ऐकून काम केलं तर निश्चितच आपण परिस्थिती बदलू शकतो व नवा देश घडवू शकतो.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात 'भाषा आणि समाज' या विषयावरील परिसंवादात मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार तसेच वसईतील भाषा शिक्षक व अभ्यासक संध्या कापडी व फ्रान्सिस डिमेलो यांनी भाग घेतला. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन चित्रकार आणि संपादक मनोज आचार्य यांनी केलं. प्रारंभी फ्रान्सिस डिमेलो आपले विचार मांडताना म्हणाले, एक काळ असा होता, की बोलीभाषेत एकमेकांशी संवाद साधताना गांवढळपणाचं वाटायचं, मात्र आमच्या आईवडिलांनी बोलीभाषेचं प्राणपणाने संवर्धन केल्यानंच, आजची पिढी ती बोलून तिचा सन्मान करत आहे. हे चांगलं लक्षण आहे. प्रमाण भाषा टिकवून ठेवायची असेल तर तिला समृद्ध करणाऱ्या बोलीभाषा जिंवत ठेवायलाच हव्यात.

यानंतर संस्कृत आणि मराठी भाषेच्या अभ्यासक संध्या कापडी आपले विचार प्रकट करताना म्हणाल्या, आजच्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थांना मराठी भाषा ही द्वितीय, तृतीय भाषा म्हणून आहे, तरीही पाठ्यपुस्तकातील तिचा अभ्यासक्रम इतका कंटाळवाणा व बोजड आहे, की त्यामुळे अमराठी काय किंवा मराठी काय विद्यार्थ्यांना मराठीबद्दल जराही गोडी वाटत नाही. गोष्टीरूपानं भाषेचं आकलन लवकर होऊ शकतं. असं असताना त्यावर पाठ्यपुस्तक मंडळ काहीही पाऊल उचलत नाही, याचं आश्चर्य वाटतं. याचबरोबर आजचा पालकही त्यास जबाबदार आहे. त्यानंतर त्यांनी वसईतील विद्यार्थ्यांना प्रमाण भाषा शिकवताना, त्या विद्यार्थ्यांवर असणाऱ्या त्यांच्या बोलीभाषेच्या प्रभावानं त्यांचे पेपर तपासताना काय अडचणी येतात हे विशद करताना व्याकरण किती महत्त्वाचं आहे, हे उदाहरणासहित पटवून दिलं. त्यांच्या थोड्या बंडखोर वाणीच्या भाषणानं उपस्थित रसिकही थोडे हलले होते.

परिसंवादाचा समारोप करताना दीपक पवार म्हणाले, राजकारण्यांनी केवळ सोईसाठीच आजवर मराठीचा पुळका ठेवला, पण व्यवहारात भाषा जपण्यासाठी काहीही ठोस प्रयत्न केले नाहीत. दुसरीकडे आपल्या आडनावाने केवळ मराठी म्हणून उरलेले जे लोक आहेत त्यांना मराठी भाषेबद्दल तळमळ अजिबात राहिलेली नाही, त्यामुळेच भाषेची दुरावस्था झालेली आहे. म्हणून सरकारची आणि जनतेचीही



खरी कसोटी आता आहे. कारण प्रथम सरकारला तज्ज्ञांच्या मदतीनं भाषाविषयक धोरण करावं लागेल. हे धोरण ठरवताना कळीचे मुद्दे असणार आहेत ते भाषाविषयक जुन्या समजुती, पूर्वग्रह आणि नव्यानं उपलब्ध झालेले ज्ञानसंशोधन; मातृभाषा आणि विविध भाषांच्या वातावरणात होणारी मुलांची वाढ आणि सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बदलत्या तंत्रज्ञानाच्या व माध्यमाच्या काळात अभिजात भाषेला येऊ घातलेलं नगण्य स्थान! म्हणूनच मराठी भाषाविषयक भूमिका निश्चित झाली, तर मग कालबद्ध कार्यक्रम ठरवणं शक्य होईल. अन्यथा सरकारच्या सांस्कृतिक धोरणाची जशी फटफजिती झाली आहे, तसंच भाषेबाबत घडून येईल.

भाषा हे केवळ संवादाचं माध्यम नाही तर ते जगण्याचं आणि संचित पुढे नेण्याचं माध्यम आहे. भाषासंवर्धन आणि जतन हा प्रश्न राजकीय आहे. भाषा टिकण्याची इच्छाशक्तीच आजच्या राजकर्त्यांकडे नाही त्यामुळेच भाषा आणि समाज यामध्ये न सांधली जाणारी दरी निर्माण होत आहे. भाषेसंबंधी आज संपूर्ण जगभर माणसं विचार करत आहेत. आपल्या भाषेशिवाय आमचं कुठेही अडत नाही ही परिस्थिती आपणच बदलू शकतो. भाषा टिकवण्यासाठी आज नव्या माध्यमांचा वापर करणं क्रमप्राप्त आहे. ते केले तरच भाषेच्या उपयुक्ततेची जाणीव वाढीस लागेल.

त्यानंतर या परिसंवादातील व्याख्यान-कर्त्यांचा व रसिकांचा भाषेविषयक प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला.

भोजनानंतरच्या तिसऱ्या सत्रात सामवेदी समाजाच्या लोकसंगीताचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्याला रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. वसई-नालासोपारा भागातील सामवेदी ख्रिश्चन आणि हिंदू समाजाचं खास वैशिष्ट्य म्हणजे हे दोन्ही समाज नाट्य संगीताचे व शास्त्रोक्त संगीताचे प्रचंड वेड असणारे. शिवाय त्याच्याबरोबरच सामवेदी भाषेतील त्यांचं लोकसंगीत त्यांनी कित्येक वर्षं प्रेमानं आणि आत्मीयतेनं टिकवून ठेवलं आहे. त्याचं प्रमाण म्हणजे या कार्यक्रमात सादर केलं गेलेलं तरुण कलाकारांचं वादन व गायन. ब्लेज डिमेलो, लरिसा आल्मेडा यांच्या सुरिल्या आवाजानं रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकलं. तर मासरल्ड मिरांडा, वाल्टर डायस, प्रवीण मोंतेरो या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचं अनुक्रमे व्हायोलिन, ट्रम्पेट, सेक्सोफोन सोलो वादन, त्यांचं वय पाहता, त्यांचं त्यांच्या वादनातलं कौशल्य चकित करणारं होतं. त्यांच्या समोर कोणतंही नोटेशन नसताना त्यांनी ते इतकं सुरात वाजवलं की अचंबित व्हायला झालं.नोटेशन्स नसताना या वाद्यांचं वादन सुरात करणं, फार कठीण गोष्ट आहे.

असा चढत्या क्रमानं हा कार्यक्रम रंगत होता. शेवटच्या सत्रात संगीता अरबुने यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक कवींच्या कवितावाचनाचा आटोपशीर कार्यक्रम झाला. कार्यक्रमस्थळी वसईतील सतीश खानविलकर, फिलिप डिमेलो, अर्नेस्ट रॉड्रिग्ज आणि सरोज रॉड्रिग्ज या गुणी चित्रकारांचे परंपरा आणि नवता यांचा संगम साधणाऱ्या चित्रांचे प्रदर्शन भरवले होते. शेवटी सुरेश वर्तक, शोभा बागूल यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी वसई-विरार परिसरातील अनेक नामवंत उपस्थित होते.


**– मनोज आचार्य**
भ्रमणध्वनी : ९०९६६८७९६३
manoj.acharya90@gmail.com



## ग्रंथालीची नवी प्रकाशने





**माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
**नारायण विष्णू आठवले**

**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

नारायण विष्णू आठवले यांनी सांगितलेल्या या कटाची पार्श्वभूमी, घातपाती कृत्ये, अटक, न्यायालयीन पातळीवरील संघर्ष आणि वेगवेगळ्या तुरुंगांतील बंदिवास यांची आणि जीवनाची साद्यंत कहाणी...

**माझं साहित्यिक खटलं**
**अ‍ॅड. यशवंत हडप**




**मूळ किंमत २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

वडील वि.वा. हडप यांच्या साहित्यातील योगदानामुळे प्रसिद्ध लेखकांची घरी ऊठबस असे. त्यातूनच यशवंत हडप यांचा बऱ्याच लेखकांशी स्नेह जुळला. त्यांच्या आयुष्याशी समरस होत लिहिलेले हे लेख. मनोरंजक व उद्बोधक माहिती देणारे...


# भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता!

**प्रभाकर भिडे**

नुकतेच 'ग्रंथाली'ने अ.पां. देशपांडे लिखित 'डॉ. रघुनाथ माशेलकर-भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता' हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्याचा प्रकाशन समारंभ सारस्वत बँकेच्या सहकार्याने सारस्वत भवनात पार पडला. यावेळी डॉ. माशेलकरांचे गुरू एम.एम. शर्मा उपस्थित होते. मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रभाकर देवधर यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

यावेळी प्रभाकर देवधर यांनी डॉ. माशेलकरांना विज्ञान-तंत्रज्ञान आणि संशोधन या क्षेत्रात आलेल्या मरगळीस दूर करण्यासाठी नेतृत्व करावे असे आवाहन केले. डॉ. होमी भाभा, विक्रम साराभाई अशी नेतृत्व करणारी मंडळी होती तेव्हा हे कार्य उत्तम घडले, आता मात्र विज्ञानाची प्रचंड हेळसांड होत आहे अशी व्यथा त्यांनी व्यक्त केली. डॉ. माशेलकरांनी आपले नेतृत्वगुण सिद्ध करून भारताला पेटंट संदर्भात जगाच्या पटलावर जसे स्थान मिळवून दिले तसेच सीएसआयआरचे संचालक म्हणून त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. परदेशांप्रमाणे, विशेषत: अमेरिकेत आहे तशा धर्तीवर विद्यापीठांमध्ये संशोधनाबाबत अंतर्भाव असायला हवा आणि त्याबाबत डॉ. माशेलकरांनी पाठपुरावा करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी अर्थसंकल्पात विज्ञानासाठी अत्यल्प तरतूद असल्याचे निदर्शनास आणून याबाबत असलेली एकूणच उदासीनता दाखवून दिली.

डॉ. माशेलकर यांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या या पुस्तकाचे लेखक




अ. पां. देशपांडे यांनी आरंभी डॉ. माशेलकरांची महत्ता केवढी आहे हे विशद करताना, त्यांनी अशा चरित्र-लेखनाची आवश्यकता का वाटली हे सांगितले. व्यक्ती आपल्यात असतानाच तिचे कार्य मांडले गेले तर विद्यार्थ्यांसह समाजालाही त्यांचे विचार ऐकण्याची उत्सुकता लागते व तशी संधी असते. यातून अशा व्यक्तीचा आदर्शच समोर उभा असतो व तो अधिक प्रेरणादायी ठरतो, असे ते म्हणाले.

डॉ. माशेलकर यांचे गुरू एम.एम. शर्मा या समारंभास अगत्याने उपस्थित होते. त्यांनी डॉ. माशेलकरांचा ध्यास आणि अधिकाधिक शिकत राहण्याची वृत्ती यांचा कौतुकाने उल्लेख केला. त्याचबरोबर आमच्यासारखी माणसे सहसा समाजापासून दूर असतात, परंतु डॉ. माशेलकर यांचा सर्वत्र संचार असतो, तो मन:पूत असतो आणि ते प्रत्येकाशी ज्या सौहार्दाने नाते जोडतात व जपतातही, हे अद्भुत आहे असे सांगत आपले नर्मविनोदी भाषण काही दाखले देत केले.

डॉ. माशेलकर यांनी आपल्या गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. माझ्या आईचा, आपण अधिक पुढचे ज्ञान मिळवत राहावे हा कटाक्ष आज मला इथे उभे असण्यास कारणीभूत आहे असे श्रद्धापूर्वक सांगितले. आई हीच माझी पहिली गुरू असल्याचे सांगून, भारतरत्न पुरस्काराने सन्मानित झालेले शास्त्रज्ञ सीएनआर राव यांनी कर्तृत्वाला सीमा नसते हा मंत्र देत आपल्यात आणखी काही करत राहण्याची ईर्ष्या कशी रुजवली याचा उल्लेख केला. एम.एम. शर्मा आणि सीएनआर राव यांच्या आठवणी सांगत या गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गुणवत्तेची शिडी कधी संपत नाही, जे मिळवले त्यावर समाधान न मानता त्याहून काही चांगले साध्य करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे हा मंत्रच त्यांनी बोलताना दिला.

सारस्वत बँकेचे अध्यक्ष एकनाथ ठाकूर प्रकृतिअस्वास्थ्यामुळे समारंभास उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या वतीने बँकेचे उपाध्यक्ष सुशील संझगिरी यांनी ठाकूर साहेबांच्या भावना बोलून दाखवल्या.

हा समारंभ बँकेच्या भवनात व्हावा ही ठाकूरसाहेबांची इच्छा होती. या इच्छेला उत्तम तऱ्हेने प्रत्यक्षात आणण्याचे काम बॅनर्जी आणि कविता बेंद्रे यांनी बजावले. त्यांच्या या सहकार्याचा उल्लेख करत कार्यक्रमाचे एकूणच सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली यांनी उत्तम केले. ●

# मानवात देवत्व पाहणारी **काळिजगुंफा**

## प्रा. अरविंद दोडे

गझल! हा हसीन काव्यप्रकार इराणकडून आपल्याला सूफी संतांनी पेश केला आणि या दिलनशीन प्रेमगीताला भक्त-भगवंताच्या नातेसंबंधांकडून प्रेमिकांच्या हृदयाकडे नेणारे भारतीय गझलकार रसिकांच्या दिलात घर करून बसले, प्रार्थनागीतांना प्रेमगीतांचा रंग देणारे. मराठी कवींनी या गझलची दखल घेतली. संतकवी अमृतराय (१६९८ ते १७५३) यांनी सुरुवात केली आणि सुमारे अडीचशे वर्षांत गझल घरोघर पोचली.

भले भले 'शेर' गझलचे गुलाम झाले! 'मिसरा'ची माया अशी, की कुणी रदीफमध्ये अडकले, तर कुणी काफियात. मतला सुचता सुचता दमछाक झाली, तर मक्ता गाठेपर्यंत 'हाय' म्हणून नाद सोडला. आधीच मराठी माणूस खडूस. त्यात वृत्ती कद्रू. प्रेमालाप करण्याऐवजी बायको शोधण्यात धन्यता मानणारी आपली 'दगडांच्या देशा'ची पाषाणहृदयी संस्कृती! एक मस्तानी (तीसुद्धा अमराठी!) सोडली तर जानेबहार, गुलेगुलजार प्रेमिका मराठी प्रेमकथांत दुसरी सापडेल तर शपथ! कृष्णजन्माष्टमीच्या उत्सवप्रसंगी कृष्णगीतांवर नर्तन करणारी मस्तानी दीडशहाण्या संस्कृतिरक्षकांनी 'नाचणारी बाई' म्हणून बदनाम केली. मराठीत गझल रुजली का नाही, याचे उत्तर इथल्या 'दगडां'मध्येच दडले आहे.

गरीबनवाज ख्वाजा चिश्ती या सूफी संताने (११४२ ते १२३६) गझल दिली आणि अजमेरहून ती भारतभर पसरली. पुढे अमीर खुसरो (१२५३ ते १३२५) याने विद्रोही गझला गायिल्या, 'मी प्रीतीचा काफिर आहे. मला इस्लामची मुळीच पर्वा नाही.'

गझलसम्राट 'मीर' (तकी मीर) म्हणतो, 'जो इस शोर से 'मीर' रोता रहेगा। तो हमसाया काहे को सोता रहेगा?।।' या प्रश्नाने माधव ज्युलियन यांची झोप उडवली आणि त्यांनी हा काव्यप्रकार वृत्तबद्ध केला. सुरेश भट यांनी गझलचा ताजमहाल केला! त्यांच्या एकनिष्ठ (वफादार) शागीर्दांनी हे 'मृगजळाचे बांधकाम' अधिक आकर्षक केले. भीमराव पांचाळे यांनी मराठी गझलगायनाला प्रसन्न प्रतिष्ठा दिली. हा सारा इतिहास आठवण्याचे कारण म्हणजे-

'काळिजगुंफा'! मानवात देवत्व पाहणारी गझल!

सदाबहार सदानंद डबीर यांचा गझलसंग्रह.

'लेहरा', 'तिने दिलेले फूल', 'सावलीतली उन्हे', 'मराठी गझल' (संपा. डॉ. राम पंडित), 'खयाल', 'गारूड गझलचे', 'साकिया', 'आनंदभैरवी' अशी त्यांची प्रकाशित पुस्तके. गझलच्या नशेत जगताना गझलचा बारकाईने अभ्यास केल्याचे त्यांच्या अभ्यासपूर्ण पुस्तकांवरून दिसून येते. वाचकांना भावणारी त्यांची भावपूर्ण गझल एकाच वेळी मनाला आणि बुद्धीला विळखा घालते. त्यांच्या गझलेत काव्य आहे. काव्यमयता आहे. परंपरा आहे आणि नवतासुद्धा आहे. आदिबंधात्मक समीक्षेच्या कसोटीवर खरी उतरणारी आहे. स्वतंत्र शैलीने ती सर्वात उठून दिसते. याशिवाय या गझलेस कुठल्याही विषयाचे वावडे नाही. म्हणूनच गझलांच्या गर्दीत डबीरांची गझल खानदानी असल्याने लक्ष वेधून घेते. त्यांच्या काव्यमूल्यांची चिकित्सा समीक्षकांना करावी लागलेच. (नाही तर मी आहेच!) तूर्त, तरी ते मुशायऱ्यात 'वाहव्वा' मिळवत आहेत, हे काय कमी आहे? (लोकप्रिय होणे म्हणजे दर्जा उंचावणे, असे भविष्यात मी विधान करणार आहेच!)

हे झाले नमन! आता गझल-कीर्तनाकडे वळूया.

गझलच्या सर्व नजाकती घेऊन 'काळिजगुंफा' उभी आहे. 'गुजगुजीत रूप। सावळे सगुण। अनुभविता मन। वेडे होय।। भ्रमरगुंफा। ब्रह्मरंध्र ते सुरेख। पाहता कौतुक। त्रिलोकी।।' असे ज्ञानेश्वर गातात. कमळपुष्प सूर्य मावळता मिटत जाते. त्यातला मधुरस चाखणारा भ्रमर गोडव्याने ग्लानीत जातो. रात्रभर त्यात अडकून पडतो. सूर्योदय झाल्यावर त्यास 'जाग' येते. 'काळिजगुंफा' वाचल्यावर रसज्ञ वाचकांची मन:स्थिती अशीच होऊ शकते.

*काहीही कारण नसता, मी उगाच हसतो आहे,*
*दुनियेत शहाण्यांच्या मी, वेडेपण जपतो आहे*

हा वेडेपणा प्रत्येक निष्काम कर्मयोग्याच्या कुंडलीत असतोच, असे नाही, म्हणून डबीर याबाबत किस्मतवाले आहेत.

*कारणे काय सांगावी?*
*जगणेच अकारण जेथे,*
*जा! नका विचारू काही,*
*मी मला शोधतो आहे!*

हा शोध कुणाला एका क्षणात लागतो, तर

कुणी जन्मोजन्मी शोधाच्या फेऱ्यातच अडकतो. 'चुकवी चौऱ्याऐंशी फेरा' हे आरतीत आळवणारे आपण कधीतरी 'स्वत:ला ओळखण्याची साधना' करतो का? केली तर नक्कीच जगण्याला नवी दिशा मिळते. 'रिकामा अर्धघडी । राहू नको' असे ज्ञानेश्वर उपदेश करतात, तेव्हा 'लटिका व्यवहार । सर्व हा संसार ।।' हेही समजावून सांगतात. म्हणून 'तू भेटशी नव्याने । बाकी जुनेच आहे।' असे समजून प्रत्येक पेच सोडवावा लागतो.

*येणारा प्रत्येकच क्षण नवीन,*
*जगणे हे रोजचेच, पण नवीन*

हा नवीनतेचा ध्यासच तारुण्याला सांभाळतो, सावरतो. मात्र संघर्ष अटळ असल्याने-

*हे माझे माझ्याशी युद्ध जुने,*
*हार कधी, जीत कधी, रण नवीन!*

'रात्रंदिन आम्हा । युद्धाचा प्रसंग ।।' याचीही आत्मानुभूती या संग्रहातून येते. 'तुटे वाद, संवाद तो हितकारी' असा समर्थ रामदास मनोबोध करतात, तो सुद्धा जिंकण्यासाठीच!

*थोडे हवे तसे, काही नको असे,*
*आयुष्य भोगले, मी हे असे कसे?*

आपल्या आवडीनिवडींशी देवाला नि दैवालाच काय, पण जगालाही काही देणेघेणे नसते, पण आशा अतूट असते-

*ही कोणती दिशा, मुक्काम कोणता?*
*आकाश वेगळे, तारा नवा दिसे!*

असा आशेचा संदेश आत्मबोधाचे डोळे उघडतो आणि भ्रमाचे महाद्वीप कोसळताना दिसतात. महाशून्याच्या डोहात डुंबून बाहेर पडल्यावर कृतज्ञतेचा ओलावा जगण्या-वागण्यात येतो. नि:शब्दता हवीहवीशी वाटू लागते. मग जिवलगाच्या गाठीभेटीतही बोलण्यासारखे काही उरत नाही. फक्त 'सोबत असणे' हाच भाव अंगावर रोमांच उभा करतो. आत्मानुभूतीला आत्मानंदाची साथ मिळाल्यावर तृप्तीचा तवंग पसरतो-

*मागणे देवाकडे मागायचे आता कसे?*
*मी मुका अन् देव बहिरा, व्हायचे आता कसे?*

याचे उत्तर विंदा करंदीकरांनी दिले आहे. ते म्हणतात, 'स्पर्शातून समाधीपर्यंत पोचता येते. ही साधनासुद्धा सोपी नसते. फुले दिसली की डोळे मिटावेत, त्यांच्या रेषांना रापत जावे. नंतर मिटलेल्या डोळ्यांवर फुले घोळवावीत. त्याच स्पर्शात डोळे हरवावेत. असे केल्याने काय होते?'

डोळ्यांतल्या बाहुलीचे लग्न लागते! अशा लग्नाला अनुभव हे वऱ्हाडी म्हणून येतात आणि माणसे ग्रंथरूपाने समोर वावरू लागतात...

*चेहरे वाचले, माणसे चाळली,*
*आणि तेव्हा कुठे जिंदगी उमजली!*

आयुष्याचा अर्थ कळला, तरी 'स्व'रूपाचा बोध होतो का?

*शेवटी जायचे जर चितेवर मला,*
*मी कशाला उभी जिंदगी जाळली?*

हा प्रश्न सुजाण शायराला कधी ना कधी सतावतोच! अर्थात खूप खूप उशीर झाल्यावर.


# काळिजगुंफा

**सदानंद डबीर**




'काळिजगुंफा' या संग्रहाद्वारे डबीर ग़ज़लांची एक वेगळी तरल शैली रुजवू पाहत आहेत; जी भौतिकातून दार्शनिक चिंतनाकडे झेपावत आहे. या संग्रहातील अनेक ग़ज़ला माझ्या या प्रतिपादनाची साक्ष देतील.

– डॉ. राम पंडित

**मूल्य ७५ रु.**
**सवलतीत ५० रु.**


स्वरूपदर्शनाचा योग राहूनच जातो. उत्तरकाळात उपरती होते. आयुष्याचे सोने व्हावे असे वाटते, तेव्हा देवाशी, दैवाशी आणि स्वत:शीसुद्धा तडजोड मन करू लागते.

*जमेल तितके जगायचे हे ठरले आहे,*
*निरोप येता निघायचे हे ठरले आहे.*

जवानीच्या जोशात अमरपणाची नशा असते. आयुष्याच्या मध्यान्हकाळी जाणवते, की आपले बरेच भ्रमसंभ्रम जळून खाक झाले आहेत. अश्रू पुसून लढा देताना काटेरी कुंपणांचे भय वाटत नाही. तेवढा निबरपणा लढून लढून अंगी आलेला असतोच. आपल्या 'नसतेपणा'चाही एक काळ येणार आहे हे प्रखर वास्तव झेलताना-

*वाळूवरती ठसे, तसे हे जगणे इथले,*
*तरीही मागे उरायचे हे ठरले आहे!*

'काहीतरी भव्य दिव्य' करून जाण्याची आस मात्र गप्प बसू देत नाही, मग करून करून शायर करणार काय? तर शायरी! तीच 'अमरता' देते... पण इतक्या सहजासहजी नाही. शायरी म्हणजे वीज! तिला अंतरात कोंडणे कठीण. लेखणीतून कागदावर रेखाटणे कठीण. दिवसा कामाचा रगाडा. रात्री मोहाचा पसारा. त्यांच्या सीमारेषेवर भेटणारी संध्या जीव नकोसा करते. केव्हातरी चांदणे मिठीत येते आणि स्पर्शाचे गाणे होते. चिरंतन वेदना, पुरातन दु:ख. त्यांत प्रश्नांचा गुंता. त्या गुंत्याचे ओझे वाहताना ज्याला गाता येते, त्याला देवत्व लाभले आहे असे खुशाल समजावे!

देवत्वात सर्वधर्म-समभाव आपोआप येतो. मग तो शायर प्रेमधर्माचा प्रचारक, पुरस्कर्ता ठरतो. रामाला दंडवत करतो. दर्ग्यावर मन्नत मागतो. मंदिरात जातो आणि मद्यालयातही बसतो. 'आनंदा'ची पर्यटनस्थळे कुठेही असतात. माणसे भेटत जातात, पण हृदये कुठे जोडता येतात? माणुसकीचे पूल बांधले तरी पादचारी हवेत ना? सारेच प्रयास फोल ठरल्यावर विनवणी करावी वाटते-

*मातीत खेळल्यावरती,*
*मळणारच होती काया,*

*मी देह टाकूनी येता, उचलून उराशी घे तू!*
बस, आणखी काय बोलणार?

'एक झाड, दोन पक्षी' हा अनुभव देणारी 'माझ्याचसारखा कोणी' ही गझल अशीच मनात घर करून बसते. 'मी' आणि 'तो', परस्परांना दोघे भेटत नाहीत. एकीकडे लौकिक आणि दुसरीकडे पारलौकिक! या दोन डगरींवर पाय ठेवल्यावर जीवाची घालमेल या गझलेला उमटली आहे.

पावलोपावली दिसणारी आणि भेटून अस्वस्थ करणारी विसंगती पाहून वाटते, झुंजणारी माणसे कुठल्यातरी वेडाने झपाटलेली असतात, त्या उलट लाचार राहणाऱ्यांच्या पाठीचा कणा मोडलेला असतो. दानव हे देवाला कचरा समजतात आणि सैतान हे श्लोक ऐकवून भगवानाला ताब्यात ठेवतात. अशा या गर्दीत आपलेच भाऊबंद असतात, हे दुर्दैव!

केव्हातरी अंतर्मुखता लाभते. भूतकाळ आठवल्यावर आयुष्याची माती झाली, हे पटते. मनाविरुद्ध जगून झाल्यावर केव्हातरी जगण्याचा सूर सापडतो. गुरुदेव रवींद्रनाथ नव्वदीत म्हणाले होते, 'आता कुठे सूर गवसलाय' आणि तेव्हाच मैफलीतून उठावे लागते. नव्या पिढीच्या हाती शमा देऊन 'अच्छा, तो हम चलते है' असे बोलताना डोळ्यांतले पाणी लपवावे लागते. 'वक्ते-रूखसत 'अलविदा' का लब्ज कहने के लिए' तन-मन थरथरते...

*का अशी आहे उदासी, काय सांगू?*
*का असे डोळ्यांत पाणी, काय सांगू?*
*भाळण्याची कारणे तर खूप होती,*
*टाळण्याची कारणे मी काय सांगू?*

दिल की हालत आणि हालात असे असतात की उत्तर देता येत नाही. मनाच्या वाटा धूसर धुक्यात हरवून जातात. चुकून जुन्या प्रेमखुणा कुठे कुठे सापडतात. पाखरे योगी होतात. ध्यानाला फांद्यांवर बसतात. वृक्ष ध्यानस्थ झाल्यावर सूर्य मावळत जातो आसवांच्या सागरात... आणि 'लागले रे नेत्र पैलतीरी' म्हणता म्हणता चराचराला व्यापणाऱ्या सावल्या चंद्रप्रकाशात मरणाची भीती दाखवतात.

*आणि आता पसायदान!*
*भणंग माझे जिणे असू दे, व्यथा असू दे,*
*या फकिराच्या ओठांवर पण, दुआ असू दे!*

फकिरी वृत्ती असली, की असे मागणे शायर खुदाकडे मागतो. स्वत:साठी नाही, तर नि:स्वार्थपणे इतरांसाठी मागतो. त्यात विद्या असते. कला असते आणि ज्ञानाचा शाश्वत आनंद असतो.

*सुखदु:खाचे गाईन गाणे मनाप्रमाणे,*
*मनात माझ्या सात सुरांचा झरा असू दे!*

कधीही न आटणारा हा झरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होतो, तेव्हा 'ये हृदयीचे, ते हृदयी' घातल्याची सार्थकता लाभते आणि बेचैन जीवास करार मिळतो. शब्दांचा गुलाल उधळून झालेला असतो. आता फक्त मौनांचे महाल बांधण्याचा ध्यास असतो. गर्दी ओसरते, तेव्हा अवघ्या दु:खांचा उत्सव रंग उधळत असतो-

*हे श्वासांचे येणे-जाणे सरेल तेव्हा,*
*नाम तुझे ओठांत, उशाशी दिवा असू दे!*

'तुझे रूप चित्ती राहो। मुखी तुझे नाम।' ही निरपेक्ष भावना ध्यानी, मनी, स्वप्नी उरते. 'रहे ना रहे हम, महका करेंगे।' ही खात्री असते. 'नीरव झाले जग भवतीचे, शांत आतही सारे। सूर्य निमाला, तारे विझले, बुद्ध हसला बहुधा।।' असे 'काळिजगुंफे'तला शायराना अंदाजवाला वारा गुणगुणतो, तेव्हा उन्हाचे शब्द होतात. सावल्या सूर धरतात. धन्यधन्य वाटते.


वेदनांची धग अखेर गझलेत उतरतेच. शब्दांना सुगंध असला तरी, आयुष्यातल्या उन्हाळ्यांनीच ते सजलेले असतात. अर्थात टाटा-बिर्लांच्या आयुष्यातल्या उन्हाळ्यांना लक्ष्मीचा वरदहस्त असतो, तर शायरांची श्रीमंती ही आसवांच्या आषाढ-श्रावणातच बहारदार होते! 'काळिजगुंफा'मधील ही सदाबहार शायरी रसिकांना दिल्याबद्दल डबीरांना सलाम!

पुन्हा भेटूया अशाच अभिजात काव्याच्या निमित्ताने.

तोपर्यंत अलविदा! शब्बा खैर!!


**– अरविंद दोडे**
१०२, श्रीहरी सोसायटी,
ओमकार हॉस्पिटलसमोर,
बालकुम पाडा नं. १,
ठाणे (पश्चिम), मुंबई-४००६०८
arvinddode@gmail.com






**सरोज जोशी यांची दोन पुस्तके**

**जिद्द**

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ५० रुपये**

**फिदा स्वत:वर**

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ५० रुपये**



# दु:ख माझे कोवळे

## सुषमा बर्वे

प्रा. प्रतिभा सराफांच्या 'दु:ख माझे कोवळे' या संग्रहात अंतरमनातील काही भाव त्यांनी जपून ठेवले आहेत. आपल्या जाणिवा हळूवारपणे मातीत पेरल्या आहेत. प्रतिभा सराफ यांना निसर्गाचे अमूप प्रेम असल्यामुळे सहा ऋतूंची दरवळ, सप्त रंगांची उधळण त्यांच्यासाठीच आहे असा त्यांचा खास विश्वास आहे. त्या म्हणतात,

*येती जेव्हा थवे पोपटी,*
*सजतो कातळ माझ्यासाठी*
*तू येता पण... रोज पसरते*
*हिरवळ हिरवळ माझ्यासाठी!*

हा दोनदा येणारा शब्द गारव्याची जादू रसिकांच्या मनावर पसरवतो. तिचे वेगळेपण असे, आपले वय सरलेले आहे. तिला वाटते, 'अजून आहे तुझी नजर पण नीतळ नीतळ माझ्यासाठी!' तिचा प्रियकर आला की सारा निसर्ग बदलून जातो, तिचा हात धरून तिच्याभोवती नाचतो. कातळही तिच्यासाठी सजतो. ह्या जादूमुळे हा परिसर एक धुंद ताल तिच्यासाठी निर्माण करतो.

तिचा पती तिला सोडून गेला आहे तरीही ती मोठ्या उमेदीनं सख्याला सांगते आहे,

प्रवीण,
*सोबतीने रे तुझ्या मज यायचे आहे.*

ह्या एका पहिल्याच ओळीतून जाणवते की तिची एक वेगळी काव्यसृष्टी नेहमीसाठी तिच्याभोवती धुंद आहे. सख्याला थांबवण्याची सावित्री-जिद्द तिच्यापाशी आहे. तिच्या मनाची ती शक्ती आहे. ही संगतसोबत घेऊन, आयुष्यातील अनेक पैलू पाहण्याची उत्सुकता शिगोशिग भरलेली असताना एकटीने ताकदीने जगण्याचा हट्ट आहे पण तरीही क्वचित हेच शब्द ओठी,

*एकटीने जीवनाचा ताण कसा साहू?*
*ठेवले सरणावरी मी सर्व खोटे अन् खरे*

अचानक येणाऱ्या दु:खानंतर मनोवृत्ती हताश होणे साहजिक असले तरीही-

सखा गेल्यावर जगणे नको वाटत असतानादेखील विविध तरुणसुलभ भावना तिच्या मनाच्या प्रांगणात गझलरूपाने नांदताना आढळतात. *तुझ्या ठिकाणी मला उद्याचे किनारे दिसत आहेत.* उद्याचे किनारे पाहणाऱ्या ह्या गोड मुलीचे रसायन काही वेगळेच आहे. यौवनातील दिखावा आणि ताठा सखयाच्या स्पर्शाने विरघळतो ही निसर्ग जादू तिला जाणवते आणि प्रांजलपणे ती कबूलही करते. दुसरीही एक गोष्ट तिच्या आयुष्याला वेगळे वळण देणारी दिसते. दुसऱ्याचा विचार करणारी कनवाळू, संवेदनशील प्रिय सखी एकरूप होऊन 'प्रियकराला भिजणे सोसले नाही, त्याला ओल बाधली आहे' हे जाणते. कळवळून ही सहनशील निरागस कवयित्री समजूतदार होऊन अत्यंत आवडत्या पावसाला, आपल्या प्रिय सख्याला जवळून 'सुखाला जा म्हणते' ही ओळ मनाला घट्ट पकडून ठेवते. हवेहवेसे वाटणारे सुख डावलून प्रिय व्यक्तीशी एकरूप होणे ही (विरहिणी) पसंत करते. हा मनाचा हळुवारपणा दाखवून ती स्वत:ला सावरते, समजावते. ही तिच्या मनाची निसर्गत: असणारी स्थिती नव्हे, पण दुसऱ्याच्या सुखासाठी आपल्या मनाच्या उलाघालीतून ती जगण्याची उमंग जीवघेण्या आठवणीसह उरात बाळगून असते. त्यामुळे गझलची सुंदर उबदार शाल पांघरून जीवन साक्षीत्वानं जगू पाहते.

*तुझी साथ नसता गझल पांघरावी*
*गझलनेच आता मला थोपटावे*

आपल्याला कुणी थोपटावे, कुरवाळावे असे वाटणे या अवस्थेत नैसर्गिक आहे. तरीही नको होणारे श्वासही घेण्याची वृत्ती मान्य करून गझलसारख्या सुखद झालीचा आधार ती घेते.

कधीतरी चटकन नकळत बेहोशीत सुखाला जा म्हटले आणि मग सखाही सोडून गेल्यावर उरांत जीवघेण्या आठवणी, नकोसे वाटणारे श्वास घेत ती राहते. ही जाणीव शब्दरूप झाली,

*शेर गझलेत मग उधळला पाहिजे।*
*लढणार मात्र आहे, मी हरणार नाही।*

असा कणखरपणा बाळगून आपण हरणारच नाही हे तर ठरवूनच टाकते आणि म्हणते-

*'आठवणींना रडता येते'*

किंवा-

*माझे कुणीच नाही, जगणे नकोच आता*
*गेल्यावरी सखा.. मज उरणे नकोच आता*

हा असा जगण्याशी मुकाबला चालला असतानाही गझलच्या चांदण्यांशी सुखसंवाद चालू असतो. पुढेही तो चालूच राहणार आहे अजून एका वेगळ्या गारव्यात, उच्च आवाजात, एक निराळी चकाकी लेऊन, तेज घेऊन प्रा. प्रतिभा सराफ यांना गझल लिहायची आहे. नुसती शेरोशायरी शब्दबद्ध करायची नव्हे, तर.... शेर गझलेत

उधळायचा आहे. धैर्याचा सत्कार केल्यामुळे प्रियकराचा स्पर्श सतत एक नवी ओळख त्यांना देतो आहे. 'गझलनेच माझ्या पुन्हा पेटले मी' असे वाटून वेदनेचे गीत कवयित्री स्वत:च गाताना दिसते. ही वीज स्वत: हा गझलचा पलिता हातात घेऊन, नवचैतन्याने 'गझल प्रांताला' एक वेगळेच वळण देणार आहे. चिरंतन वेदना हेच तिचे गीत असले आणि कोरड्या अश्रूत रुजणे नकोसे झाले तरीही वाळलेल्या, वठलेल्या झाडातून पुन्हा 'हिरवेगार' होण्याचे दिव्य स्वप्न ती पाहते आहे.

समजूत घालणारे सोबती जवळपास नसले तरीही ती स्वत:शीच म्हणते,

*गवसले तुझ्यातच*
*उद्याचे किनारे*

ही प्रतिमा किती अर्थवाही, उदात्त, उन्नत आहे. गझलची उंची क्षितिजापलीकडे नेणारी! 'गेला सखा तरीही त्याचीच याद येते.' त्यामुळे पुढील किनाऱ्यांचा मागोवा घेताना प्रियकराच्या मंद स्मृतिगंधातून सुखाचा नवा किनारा तिला गवसणार आहे. तो सुखाचा मनोरा ती कवितेतूनच पुन्हा उभा करणार आहे. त्या गझलगीतांच्या धुंदीत नाचत राहून त्या सुरेल सुरांतून 'नव-निर्मिती' होत राहणार आहे.

*मी न मागता तारुण्याचे देणे आहे*
*भरभरून मज आयुष्याचे देणे आहे*

ह्या प्रतिभेला कळले आहे, 'लेखणीस या तव प्रेमाचे देणे आहे!' भविष्यकाळाचा 'शुभंकर' असा भाव जाणून तिच्या मनामनातून, कणाकणांतून, अंगअंगाने 'पानफुटीचे, आनंदाचे देणे, नैसर्गिकरीत्या फुलून येते आहे. श्रावणातल्या सुखसरींनी ती शहारते आहे.

*तू नसताना फुले शहारा अंगभरूनी*
*ऋतू बहराच्या त्या स्पर्शाचे देणे आहे.*

हे देणे किती किती प्रकारांनी 'झाली फुले कळ्यांची' इतक्या सहजपणे उमलणार आहे कोण जाणे!

आपली जुनी कात निघाल्यावर सतेज होऊन ती म्हणते, 'मोरपंखी पदर फाटल्यामुळे तू मला परत लौकर (लवकर?) पैठणी घे.' स्त्रीसुलभ लडिवाळ अशी ही मागणी साजणाला भुलावण घालते. ती म्हणते, पूर्वायुष्यात तुझ्याशी धुसफूस केली, आता मात्र मला तुझ्या मौनाचे सामर्थ्य उमगले आहे. ही तिची समज किती काव्यात्मक आहे.

आणखी एक प्रतिभेची प्रतिमा किती वेगळी आहे पाहा–

*तू नसताना*
*पिसले पत्ते पुन्हा पुन्हा मी...*
*राजासाठी*
*गुलाम नोकर फक्त गवसले,*
*तू नसल्यावर*
*हे नसल्यावर यशाचे जवळ येणे...*

नसण्यातून काय काय घडू शकते! भविष्याचा वेध घेता येतो. तुझ्या जाण्यानंतर तुझ्या पायाखुणांवरून मी चालले आहे. त्यावेळी अंगणात फुलपाखरे आली आणि सांगू लागली.

*तुझा चेहरा दिसू लागला*
*मुलीत आता*
*जगण्याचे मी पुन्हा ठरवले, तू नसल्यावर*

हा संदर्भ कवयित्रीला एक सुंदर तरुण मुलगी आहे असे समजले तर अधिक स्पष्ट होतो. कवयित्री वाऱ्याशी भांडण्यातली मौज अनुभवू शकते. ताऱ्यांना मोजण्याची अवघड कलाही तिला अवगत आहे. प्रियकराने सहवास असताना सखयीकडे लक्ष दिले नाही. पण त्याच्या असून नसण्यातले संदर्भ व अर्थ तिला कळले नाहीत. आता अशी मन:स्थिती आहे, 'उमगत नाही नसून असणे!'

रसिकांची भरपूर दाद मिळाल्यावर ती सुखावली तशी ती दु:खितही झाली. पण तिची कवितासखी कुणापुढेही संधी मिळाली तरी झुकत नाही. झुकल्यामुळे वरत चढण्याची स्वप्ने तिने कधी पाहिली नाहीत. परंतु,


पानगळीनंतर येणाऱ्या फुलांच्या मागावर ती आहे. सगळ्यांसाठी सगळं ती नकळत करत राहणार आहे. ह्यातच तिच्या कलाजीवनाचे मर्म आहे.

**– सुषमा बर्वे**
१७७ बर्वे हाऊस, सांडू रोड,
चेंबूर, मुंबई–४०००७१

## दु:ख माझे कोवळे – प्रतिभा सराफ

'मात्र एक नाही' व 'मातीत पूर्णत्वानं रुजण्यापूर्वी' ह्या कवितासंग्रहांद्वारे प्रतिभा सराफांनी आपले 'कवीपण' समर्थपणे सिद्ध केलेले आहेच. आता त्या जाणीवपूर्वक गझललेखनाकडे वळल्या आहेत. 'अभ्यासोनी प्रकटावे' ह्या पध्दतीने. केवळ चूष म्हणून किंवा आज गझलांना बरे दिवस आले आहेत म्हणून नव्हे, तर हे 'कोवळे दु:ख' तितक्याच तरलपणे आणि नेमकेपणाने, तरीही 'लिरिकली' व्यक्त होण्यासाठी गझलनेच त्यांना खुणावले म्हणून. गझल हा काव्यप्रकार तंत्रानुगामी असल्याने कवीची कसोटी पाहणारा आहे. तंत्र सांभाळूनही गझलेला कवितेच्या पातळीवर नेण्यासाठी समर्थ प्रतिभेचाच कवी हवा. प्रतिभा सराफांना तशी प्रतिभा आणि शब्दांची अतिशय चांगली जाण लाभली आहे. मराठी गझलरसिक ह्या तरल स्त्री-जाणिवांच्या गझलांचे नक्कीच स्वागत करतील.

– सदानंद डबीर




**मूल्य ६० रु.**
**सवलतीत ३५ रु.**

# डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रसिद्ध विचारसंचित

## मराठी ग्रंथविश्वातील अपूर्व घटना!
## आमचा बाप आन् आम्ही नाबाद १,६०,००० प्रती


**१६१ वी आवृत्ती!**




मूळ किंमत १२० रुपये सवलतीत ८० रुपये
टपालखर्च २० रुपये

'लसावि–माझ्या समग्र अभिव्यक्तीचा' या ग्रंथामध्ये नरेंद्र जाधवांच्या विचारांची झेप, त्यांचे समृद्ध अनुभवविश्व–व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक–त्यांचा लोकसंग्रह आणि त्यांचा झपाटा यांचा 'प्रोमो' वाचायला/पाहायला मिळतो.

– कुमार केतकर




जनआवृत्ती मूळ किंमत ४०० रुपये
सवलतीत ३०० रुपये
टपालखर्च १०० रुपये

**महामानव डॉ. आंबेडकरांची अलौकिक भाषणे आणि लेखन**
**अनुवाद, संकलन व संपादन – डॉ. नरेंद्र जाधव**




**बोल महामानवाचे**
खंड १ पृष्ठे ४२२
खंड २ पृष्ठे ६९२
खंड ३ पृष्ठे ५५६

संचाची मूळ किंमत ₹ १२००
सवलतीची किंमत ₹ ८००


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे

**प्रज्ञा महामानवाची**
डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे समग्र लेखनकार्य

- भाग एक : राजकीय लेखन
  मूळ किंमत ₹ ३५० सवलतीत ₹ २००
- भाग दोन : अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय लेखन
  मूळ किंमत ₹२०० सवलतीत ₹१२०
- भाग तीन : मानववंशशास्त्रीय लेखन
  मूळ किंमत ₹ २२५ सवलतीत ₹ १५०
- भाग चार : बुद्ध आणि त्यांचा धम्म
  मूळ किंमत ₹ ७५ सवलतीत ₹४०




**'रवींद्रनाथ टागोर समग्र जीवनदर्शनः संग्राह्य ग्रंथत्रिवेणी**




**'रवींद्रनाथ टागोर' – डिलक्स आवृत्ती संच**
**मूळ किंमत १२०० रु.**
**सवलतीत ८०० रुपयांत**
**अधिक टपाल खर्च १०० रु.**

## अनुराधा गोरे यांची सात पुस्तके




मूल्य १३० रु.
**सवलतीत ८० रु.**

### जॅक ऑफ ऑल

मुलांचा बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक बुद्ध्यांक विकसित करायचा तर आजच्या मुलांनी 'जॅक ऑफ ऑल' बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मग जाणत्या वयात वाब संधी मिळताच 'मास्टर ऑफ वन' बनण्याचा निर्णय त्यांना घेता येईल...




### कळी उमलताना

मूल्य २०० रु.
**सवलतीत १२० रु.**

### परीक्षेची भीती कशाला?

या पुस्तकात असे अनेक तंत्र-मंत्र आणि यत्न-प्रयत्न आपण पाहणार आहोत, की ते आत्मसात केल्यास तुम्हाला शाळा-महाविद्यालयातीलच काय पण कोणतीही परीक्षा सहज सोपी वाटेल आणि मग यश तुमचेच असेल...




मूल्य २५० रु.
**सवलतीत १५० रु.**

### १९७१चा रणगसंग्राम

मूल्य ३५० रु.
**सवलतीत २०० रु.**

### आचंद्र-सूर्य नांदो...

मूल्य १६० रु.
**सवलतीत १०० रु.**














### गाऊ त्यांना आरती

मूल्य ३०० रु.
**सवलतीत १८० रु.**

### वारस होऊ अभिमन्यूचे

मूल्य ३०० रु.
**सवलतीत १८० रु.**




**प्रल्हाद जाधव**

लिखित

# तांबट

सुखाच्या शोधात भटकत राहणं
हा माणसाचा स्वभाव आहे.
पण बऱ्याचदा ते सुख
आपल्या जवळच कुठंतरी असतं,
बघण्याची दृष्टी असली म्हणजे झालं...

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

### इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर मराठीत प्रथमच
## सुरेश वाघे लिखित 'संकल्पनाकोश'चे पाच खंड












**संचाची मूळ किंमत ३२०० रु. सवलतीत २४०० रुपयांत**
**टपालखर्च १५० रु.**


## ग्रंथालीची चार महत्त्वपूर्ण प्रकाशने


**'अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन, कथा, कविता यांचे बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी केलेले संकलन-संपादन**





### आंबेडकरी विचारधारा
('अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन)
**बबन लोंढे**
**सुधाकर गायकवाड**
**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३६० रुपये**

### काळोखगर्भ
('अस्मितादर्श'मधील निवडक कथा)
**बबन लोंढे**
**सुधाकर गायकवाड**
**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**



### निर्णायक युद्धानंतर...
('अस्मितादर्श'मधील निवडक कविता)
**बबन लोंढे**
**सुधाकर गायकवाड**
**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**




### एका कवीचे जीवनगाणे
वामन कर्डक यांची चरित्रकथा
**बबन लोंढे**
**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

## २५ डिसेंबर, 'ग्रंथाली' वाचकदिनी प्रसिद्ध होत आहेत



**हुमान** – संगीता धायगुडे (आत्मकथन)
**शापित भूमी** – उमेश कदम (कथासंग्रह)
**मला समजलेले पाच हिंदू धर्म** – शरद बेडेकर (तत्त्वचिंतन)
**बोधकथा भाग २** – दिलीप पांढरपट्टे (कथा)
**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१३** – सुधीर थत्ते/नंदिनी थत्ते
**गुलजारांच्या कविता** – रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ (कवितासंग्रह)

*आणि*

**आगळा विषय, वेगळी मतं मांडणारा**

## परिसंवाद



स्थळ : कीर्ती कॉलेज पटांगण, प्रभादेवी ❁ वेळ : सायंकाळी ४ ते रात्री ९

**सर्वांना आग्रहाचे निमंत्रण**

**ग्रंथाली**




# घडत गेलेली गोष्ट

**विजया राजाध्यक्ष**

**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**

''तुमचं काय चाललंय मॅडम? लेखन वगैरे...''
''विशेष काही नाही गं. बघू काही सुचलं तर. ते आपल्या हातात थोडंच असतं? काहीतरी सापडतं अचानक! पण ते जरी लिहिलं तरी वाटतं, अजून काहीतरी उरलं आहे. मी त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही... एका अर्थानं ते बरंच असतं म्हणा! जाऊ दे, उगाच काहीतरी बोलत बसले.'' कॉफी घेता घेता सुजाता म्हणाली,
''मॅडम, तुम्ही एक कथा लिहीत होतात ना! तुम्ही तसं सांगितल्याचं आठवलं. पूर्ण झाली का ती?''
''छे गं! कथा कधी संपूर्ण, समाप्त होतात का? त्या आपल्या मनात घडतच राहतात!''

# अंतरंग

**विजया राजाध्यक्ष**

**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**




'अंतरंग'मधील लेखांचा कदंब, तळ्यात...मळ्यात, अनुबंध व स्वच्छंद या इतर पुस्तकांमधील लेखांसोबत विचार करताना पुन:पुन्हा जाणवते की, ललितलेख निबंध हा प्रकार खरोखरीच लवचीक, मुक्त आहे. कधी ती कथा असते, कधी संक्षिप्त प्रवासवर्णन, कधी व्यक्तिचित्र, तर कधी व्यक्तिचित्रात अंतर्भूत असलेली समीक्षाही. 'सहा दिवसांचा वानप्रस्थ' या माझ्या दीर्घ ललितनिबंधात, त्या घाटाची ही सगळी रूपे सामावलेली आहेत. तो वाचला की वाटते, आपण या वाटेने अजून चालत राहायला हवे... कालांतराने थोडीफार चाललेही. ते लेख एकत्रित करण्याची इच्छा होती. 'ग्रंथाली'च्या अगत्यामुळे ती फलद्रूप होत आहे. खरे म्हणजे माझा 'फॉर्म' कथा हाच, पण ललित लेखनाच्या वेगळ्या वाटेने जाताना मन नेहमीच ताजेतवाने राहिले, हे मात्र खरे!

# कवयित्री नीरजा यांची दोन कवितासंग्रह




## स्त्रीगणेशा

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**


'स्त्री' ही नीरजा यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. ती तिच्या दैहिक, मानसिक, आत्मिक अनुभूतींसह जशी साकार होते, तशीच ती समाजाच्या 'स्त्री'विषयक धारणेसह, तिच्या संरचित रूपांसह अभिव्यक्त होते. समाजव्यवस्था आणि स्त्री यांच्यामधल्या ताणांनी या कवितांमधले जग आंदोलित होत असलेले आढळते. 'मनाच्या पाटीवरचं पारंपरिक चित्र' आणि वास्तव यातल्या अंतरांनी घडत आलेला स्त्रीनिष्ठ इतिहास या कवितांतून उलगडत जातो. अशा प्रकारच्या इतिहासाची रचना करणे हे नीरजा यांच्या कवितेचे मुख्य वैशिष्ट्य आहे...

– वसंत आबाजी डहाके


चर्चमध्ये घुमणाऱ्या
सगळ्या प्रार्थना
रडून दमल्या
तसे त्यानं
क्रूसावरचे हात वर करून
एक कडकडून जांभई दिली.

## निरन्वय

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**





## डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध होणारी पुस्तके
















**बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष**
हेमा साने

**बोलावें ते आम्ही...**
श्रीकांत देशमुख

**चॅनल 4 Live**
समीरण वाळवेकर

**मे आय कम इन...?**
तन्वी डोके

**स्पर्श हरवलेले**
सुलभा कोरे

||ग्रंथाली||
द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com, granthali02@gmail.com
वेळ : सकाळी ११ ते ६

# दोन ग्रंथसंच योजना

## सूची

**सोबतच्या यादीतील सुटी पुस्तके हवी असल्यास ४०% सवलतीत मिळतील. चेक/डी.डी./म.ऑ. 'ग्रंथाली' नावे पाठवावा.**

**२१० पुसतके संच क्रमांक १ मूल किंमत २७४१० सवलतीत संचाची किंमत १३००० रु.**

१. **खेळ साडेतीन टक्क्यांचा**
लक्ष्मण माने ● १६० रु.
२. **राजकीय पक्षनिष्ठा मानसिक-बौद्धिक गुलामी**
दि. म. संत ● ८० रु.
३. **अंधश्रद्धा निर्मूलन-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
संदीप जावळे ● १२० रु.
४. **प्रर्वतन**
संदीप जावळे ● १२० रु.
५. **विचारवेध**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १८० रु.
६. **विचारवेध : भाग ३**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● २५० रु.
७. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-अनुभववाद**
दि.य. देशपांडे ● २०० रु.
८. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान प्रज्ञावाद**
दि.य. देशपांडे ● १८० रु.
९. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-कांट**
दि.य. देशपांडे ● १२० रु.
१०. **विवेकवाद**
दि.य. देशपांडे ● १०० रु.
११. **रिल्केची दहा पत्रे**
अनिल कुसुरकर ● १०० रु.
१२. **मी हिंदू झालो!**
डॉ. रविन थत्ते ● १०० रु.
१३. **विज्ञानाचे तत्त्वज्ञान**
संपादक : शरद देशपांडे, प्रदीप गोखले, सदानंद मोरे ● ३०० रु.
१४. **नेगल - (भाग १)**
विलास मनोहर ● १२० रु.
१५. **नेगल -(भाग २) हेलकशाचे सांगाती**
विलास मनोहर ● १२० रु.
१६. **एक पूर्ण-अपूर्ण**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१७. **सत्तरीचे बोल...**
डॉ. पी. एस. रामाणी ● १०० रु.
१८. **पथदर्शी**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१९. **जे देखिले...**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
२०. **एक दिवस (जी)वनातला**
नीला सत्यनाराण ● २०० रु.
२१. **ध्यास आणि प्रवास**
सुलभा वर्दे ● २०० रु.
२२. **माझ्या वकिलीची पन्नासी**
एस.आर. चिटणीस ● १६० रु.
२३. **आमचा बान आन् आम्ही - स्वरूप आणि समीक्षा**
संपा. शैलेश त्रिभुवन ● ४०० रु.
२४. **झपाटलेली झाडे**
सरोज जोशी ● २५० रु.
२५. **चिं.त्र्यं. खानोलकर (ललित चरित्र)**
दीपक घारे ● १८० रु.
२६. **व्हिन्सेंट व्हॅन गॉच्या आठवणी**
अनिल कुसुरकर ● १२५ रु.
२७. **गुन्हेगारांच्या मागावर**
यशवंत व्हटकर ● १५० रु.
२८. **सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
यशवंत व्हटकर ● २५० रु.
२९. **नृत्यसौदामिनी दमयंती जोशी**
प्रा. सुहासिनी पटवर्धन ● १०० रु.
३०. **पालावरचं जग**
लक्ष्मण माने ● १४० रु.
३१. **बंद दरवाजा**
लक्ष्मण माने ● १८० रु.
३२. **उद्ध्वस्त**
लक्ष्मण माने ● १०० रु.
३३. **भटक्याचं भारूड**
लक्ष्मण माने ● १५० रु.
३४. **नियतीशी करार**
संदीप जावळे ● ३०० रु.
३५. **घटना नारायणपूरची**
शशी देशपांडे, अनु. मोहिनी दातार ● १०० रु.
३६. **हॅरिसबाई**
कृ.ना. कुडाळकर ● १२० रु.
३७. **स्वदेश**
भूषण केळकर ● १६० रु.
३८. **टकिला टकाटक**
भूषण केळकर ● ३०० रु.
३९. **संघर्ष नागरी निवाऱ्याचा**
संपा. जयंत धर्माधिकारी, अमरेंद्र धनेशर ● १२५ रु.
४०. **गुडबाय कॅन्सर**
विद्या मुडगेरीकर ● १०० रु.
४१. **अधुरी एक कहाणी**
अंजली ठाकूर, दिनकर आजगावकर ● २५० रु.
४२. **विकासाची रूपरेषा - परिसंवादांच्या अनुभवातून**
सु.गो.तपस्वी ● ३०० रु.
४३. **क्षितिजावरील शलाका**
शारदा साठे ● २०० रु.
४४. **मुलगी झाली हो...**
ज्योति म्हापसेकर ● ६० रु.
४५. **ही आपलीच माणसं**
मंगला खाडिलकर, गजानन सबनीस ● २५० रु.
४६. **कोहम् धाबा**
अनुवाद-संजीव दहिवदकर ● १०० रु.
४७. **पैलूंविना हिरकणी**
सुधा सोनाळकर ● ८० रु.

४८. **जग जनुकांचे**
डॉ. हेमा पुरंदरे ● १०० रु.
४९. **वृद्धत्वाची शान**
पद्माकर नागपूरकर ● १२५ रु.
५०. **मनातलं काहीसं**
सुधा सोमण ● १२० रु.
५१. **पानीकम**
संजय पवार ● १०० रु.
५२. **वारस होऊ अभिमन्यूचे**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
५३. **न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**
(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने) ● ४०० रु.
५४. **सोन्याच्या धुराचे ठसके**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २७५ रु.
५५. **सौदीच्या अंतरंगात**
पद्मा कऱ्हाडे ● २०० रु.
५६. **मौन होई बोलके**
रोहिणी लिमये ● २०० रु.
५७. **गांगल ७० ग्रंथाली ३५**
संपादन सुदेश हिंगलासपूरकर ● ३०० रु.
५८. **संकल्प**
संपादन संजीव खांडेकर ● ३०० रु.
५९. **भिडू**
भगवान इंगळे ● २५० रु.
६०. **पंखाविना भरारी**
प्रसादची आई (शरयू घाडी) ● २०० रु.
६१. **स्वास्थ्यवृत्त**
डॉ. शरदिनी डहाणूकर ● १०० रु.
६२. **कानोसा**
डॉ. राणी बंग ● २५० रु.
६३. **आयुर्वेदातील स्त्रीविज्ञान**
शुभदा वेलणकर ● ४०० रु.
६४. **अंगणातले आभाळ**
यशवंत पाठक ● ३०० रु.
६५. **आभाळ माझं**
विमल कुलकर्णी ● १०० रु.
६६. **गोष्ट झऱ्याची**
सुधा वर्दे ● १५० रु.
६७. **कोल्हाट्याचं पोर**
किशोर शांताबाई काळे ● १०० रु.
६८. **आमचा बाप आन् आम्ही**
(१६१ आवृत्ती)
नरेंद्र जाधव ● १२० रु.
६९. **बलुतं**
दया पवार ● १०० रु.
७०. **उपरा**
लक्ष्मण माने ● १०० रु.
७१. **आयदान**
उर्मिला पवार ● २२० रु.
७२. **हृदयस्थ**
डॉ. अलका मांडके ● २५० रु.
७३. **ताठ कणा**
डॉ. पी.एस. रामाणी ● २५० रु.
७४. **मैत्र जीवाचे**
विदुर महाजन ● २०० रु.
७५. **पाचट**
योगीराज बागूल ● २५० रु.
७६. **जगायचंय प्रत्येक सेकंद**
मंगला केवळे ● ८० रु.
७७. **वन फॉर सॉरो**
अनुराधा कुलकर्णी ● १२५ रु.
७८. **उदई**
प्रकाश चव्हाण ● १६० रु.
७९. **जय हो**
कमल देसाई ● ३०० रु.
८०. **क्लोरोफॉर्म**
डॉ. अरुण लिमये ● २०० रु.
८१. **असुरेंद्र**
ना.बा. रणसिंग ● ४०० रु.
८२. **फोडणी**
रामदास फुटाणे ● १०० रु.
८३. **एका शहराच्या खुंटीवर**
चंद्रशेखर सानेकर ● ७५ रु.
८४. **पाऊस**
अरुण शेवते ● ६० रु.
८५. **शोधवर्तन**
नरेंद्र बोडके ● ८० रु.
८६. **बावनकशी**
हॅमेलिआ ● ६० रु.
८७. **सफिया बेगम**
अरुण शेवते ● १०० रु.
८८. **सत्ता**
चंद्रशेखर भुयार ● ७५ रु.
८९. **एका ऊन्हाची कैफियत**
चंद्रशेखर सानेकर ● ६० रु.
९०. **कॉमन मॅन**
हेरंब कुलकर्णी ● ८० रु.
९१. **स्वत:तील अवकाश**
ज्ञानेशर मुळे ● १२५ रु.
९२. **मितवा**
उषा मेहता ● ५० रु.
९३. **निरंतर**
उषा मेहता ● २०० रु.
९४. **संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
संजीव खांडेकर ● ६० रु.
९५. **चॅनेल : डी–स्ट्रॉयरी**
श्रीधर तिळवे ● १२५ रु.
९६. **काही अनुभव काही आठवणी...**
रणजीत शहा ● ५० रु.
९७. **शांती अवेदना...**
पुष्पाग्रज ● ८० रु.
९८. **बदलत गेलेली सही...**
अंजली कुलकर्णी ● १२० रु.
९९. **उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर ● ७५ रु.
१००. **या दशकाचा सातबारा कोराच राहील**
शंकरराव दिघे ● ८० रु.
१०१. **आईच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०२. **...माझ्या काळाचा अनुवाद**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
१०३. **कवितेच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०४. **सनद**
नारायण सुर्वे ● १०० रु.
१०५. **वाटेवरच्या कविता**
अशोक नायगावकर ● ५० रु.
१०६. **सैतानाची खुशी**
राकेश भडंग ● ८० रु.
१०७. **बाईच्या कविता**
किरण येले ● ८० रु.
१०८. **प्रत्ययपर्व**
मनोहर जाधव ● ७० रु.
१०९. **सुगंध उरले, सुगंध उरले**
अरुणा ढेरे ● १६० रु.
११०. **गारुड गझलचे**
सदानंद डबीर ● १२० रु.
१११. **अन्वय**
उषा मेहता ● १०० रु.
११२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००५**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११३. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००८**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११४. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००९**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११५. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२०१०**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११६. **उर्मिला**
डॉ. वसंत वऱ्हाडपांडे ● १०० रु.
११७. **धमधोकार**
प्रकाश पेठे ● १२० रु.
११८. **विदेशी खिचडी**
सुधीर शं. कुलकर्णी ● १०० रु.

११९. **हाक/प्रतिसाद**
निदा फाजली,
अनुवाद-इब्राहीम अफगाण● २०० रु.
१२०. **काचेपाठचा समुद्र**
स्मिता भागवत ● १६० रु.
१२१. **निशाणी – डावा अंगठा**
रमेश इंगळे-उत्रादकर ● ३०० रु.
१२२. **रानभूल**
प्रल्हाद जाधव ● १२५ रु.
१२३. **संभव**
माधव चव्हाण ● १५० रु.
१२४. **विवेकीजनीं ह्या मज जागविलें**
प्र.ब. कुळकर्णी ● २०० रु.
१२५. **सिंहासन**
अरुण साधू ● २५० रु.
१२६. **मोरपिस**
अनुराधा गानू ● १६० रु.
१२७. **प्रकाशवाट**
वंदना करंबेळकर ● १२५ रु.
१२८. **संचिताची कोजागिरी**
यशवंत पाठक ● ३०० रु.
१२९. **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**
प्रा. द.ता. भोसले ● ३०० रु.
१३०. **विज्ञान विशारदा**
वसुमती धुरू ● १२५ रु.
१३१. **भारतातील स्टेनलेस स्टील संस्कृतीचे जनक**
संकलन-संपादन
शरयू ठाकूर, दिनकर गांगल● २५० रु.
१३२. **महारूद्र** (आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)
जी.बी. देशमुख ● १२० रु.
१३३. **गांधी**
नलिनी पंडित ● २०० रु.
१३४. **लालबाग**
आदिनाथ हरवंदे ● ४०० रु.
१३५. **विज्ञानशिक्षण – नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान ● १६० रु.
१३६. **का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने ● ५० रु.
१३७. **शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे ● २०० रु.
१३८. **शिक्षणातील लावण्य**
लीला पाटील ● १०० रु.
१३९. **बालकहक्क**
लीला पाटील ● २२५ रु.
१४०. **शाळा आहे शिक्षण नाही**
हेरंब कुलकर्णी ● १०० रु.
१४१. **सुरवंटाचे फुलपाखरू**
डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले● १२० रु.
१४२. **कळी उमलताना**
अनुराधा गोरे ● २०० रु.
१४३. **आजीच्या गोष्टी (भाग १)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१४४. **आजीच्या गोष्टी (भाग २)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१४५. **टेलिफोन ते मोबाईल**
चिन्मय थत्ते ● ६० रु.
१४६. **गोईण**
राणी बंग ● १६० रु.
१४७. **शीळ**
सरोज जोशी ● १५० रु.
१४८. **वाहतूक ठप्प**
अशोक दातार ● १२० रु.
१४९. **हत्या**
राकेश भडंग ● ३५० रु.
१५०. **संत तुकोबाची रोजनिशी**
रवींद्र पाटील ● ४०० रु.
१५१. **आभरान**
पार्थ पोळके ● २०० रु.
१५२. **असाही एक महाराष्ट्र**
संदेश भांडारे ● ३५० रु.
१५३. **माणूस नावाचे जगणे**
डॉ. रवीन थत्ते ● ८० रु.
१५४. **आरोग्याचा अर्थ**
डॉ. आनंद नाडकर्णी ● २०० रु.
१५५. **धुंद-स्वच्छंद**
वसंत वसंत लिमये ● ६० रु.
१५६. **ध्येयनिष्ठ कर्मयोगी**
अरविंद पोतनीस ● २५० रु.
१५७. **जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या**
सुधीर शं. कुलकर्णी ● १५० रु.
१५८. **मनोहारी**
विठ्ठल देशपांडे ● १२५ रु.
१५९. **आठवणीतले बाबासाहेब**
योगीराज बागूल ● ३०० रु.
१६०. **चंदनाची पाखर**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६१. **आभाळाचे अनुष्ठान**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६२. **येणे बोधे आम्हा**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६३. **खेळ मांडला**
विभावरी दांडेकर ● १५० रु.

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ पुस्तके

१६४. **पहिला भारतीय वैमानिक**
रत्नाकर वाशीकर,
आ.रा. मराठे ● ४५ रु.
१६५. **गुणवान मुलांचे संगोपन**
अरुणा भिडे ● ५० रु.
१६६. **सदानंद!**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१६७. **आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी**
भवरलाल जैन ● ४५ रु.
१६८. **परराष्ट्रधोरण : भारत व जागतिक संबंध**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६९. **परराष्ट्रधोरण : आपले शेजारी**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१७०. **सागर-महासागर**
शैलजा सांगळे ● ४५ रु.
१७१. **लहरी हवामान**
डॉ. कुमार कुलकर्णी ● ४५ रु.
१७२. **वेळंब**
डॉ. कमलाकर देवधर ● ४५ रु.
१७३. **पिंपरी-चिंचवड : जुनं-नवं**
मीरा जोशी ● ४५ रु.
१७४. **संख्यादर्शन**
स. पां. देशपांडे ● ४५ रु.
१७५. **कांगारूंचे मराठी आप्त**
कमलिनी काटदरे
निरंजन उजगरे● ४५ रु.
१७६. **फळांचा राजा**
स्मिता देवधर ● ५० रु.
१७७. **एक आटपाट लोकमान्य नगर**
दिलीप काटदरे ● ५० रु.
१७८. **सहनैसर्गिक जीवनशैली**
डॉ. श्याम जोशी ● ५० रु.
१७९. **क्षुधाशांती ते मॅकडोनाल्ड**
सु.गो. तपस्वी ● ५० रु.
१८०. **प्रगती पुलांची**
सुधीर शं. कुलकर्णी ● ५० रु.
१८१. **प्रार्थनाविचार**
माधवी कवी/घनश्याम कवी● ५० रु.
१८२. **सुशेगाद् गोवा**
नंदिनी महाडेश्वर ● ५० रु.
१८३. **पुस मॉथ ते डॅश-४००**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८४. **एड्स-कथा आणि व्यथा**
डॉ. दीप्ती डोणगावकर ● ५० रु.
१८५. **इस्रायलची मराठी लेकरे**
संध्या जोशी ● ५० रु.

१८६. **आकाशगामी**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८७. **देव जाणिला कुणी?**
प्रेमला काळे ● ५० रु.
१८८. **आधुनिक एकलव्य**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१८९. **स्वीय शेती**
गो. ह. दंडवते ● ५० रु.
१९०. **नेवासे**
संजय बोरुडे ● ५० रु.
१९१. **नाटळ**
मनोहर सावंते ● ५० रु.
१९२. **आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव ● ५० रु.
१९३. **बालकल्याण ते बालहक्क**
माधुरी भिडे ● ५० रु.
१९४. **इराण**
पद्मा कऱ्हाडे/
पुरुषोत्तम कऱ्हाडे ● ५० रु.
१९५. **चांगलं मरण**
डॉ. कमलाकर देवधरे ● ५० रु.
१९६. **वृद्धत्वः देशोदेशी**
पी. के. मुत्तगी/
पद्माकर नागपूरकर ● ५० रु.
१९७. **चित्रसंवाद**
संदीप देवल ● ८० रु.
१९८. **नाशिक**
डॉ. सरल धारणकर ● ५० रु.
१९९. **कऱ्हाड**
विजय माळी ● १०० रु.
२००. **रँग्लरचं ग्लॅमर**
स.पां. देशपांडे ● ४५ रु.
२०१. **मनाचे मनोगत**
साधना कामत ● ५० रु.
२०२. **हरित वसईचा लढा**
मार्कुस डाबरे ● १५० रु.
२०३. **स्मृतीच्या हिंदोळ्यावर**
साधना कामत ● १५० रु.
२०४. **ना खंत कशाची!**
भगवंत पंत ● १०० रु.
२०५. **स्वप्नांची बाग**
डॉ. उषा हरदास ● ८० रु.
२०६. **तांबडं रक्त**
अरुण मोकाशी ● ४०० रु.

**मातृभूमी सेवा ट्रस्ट पुस्तके**

२०७. **ओऽ कॅनडा!**
स्मिता भागवत ● १२० रु.
२०८. **स्थानभ्रष्ट**
डॉ. शांतिलाल धनिक,
शब्दांकन : स्मिता भागवत ● ३०० रु.
२०९. **पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे**
स्मिता भागवत ● ६० रु.
२१०. **जीवनदान**
राजीव जोशी ● १०० रु.

**१०० पुसतके संच क्रमांक २ मूळ किंमत १८४७५ रु.**
**सवलतीत संचाची किंमत ९५०० रु.**

१. **शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस ● २५० रु.
२. **दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर ● २२५ रु.
३. **नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर ● २०० रु.
४. **टिळक ते गांधी मार्गेखाडिलकर**
मुकुंद वझे ● १२० रु.
५. **मराठी भाषेतीलअसभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे ● २५० रु.
६. **अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे ● १५० रु.
७. **आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● १८० रु.
८. **माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू ● २७५ रु.
९. **संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे ● १५० रु.
१०. **परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत ● १५० रु.
११. **तेजस्विनी**
स्मिता भागवत ● १५० रु.
१२. **मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे ● १०० रु.
१३. **आकार**
सदाशिव साठे ● २५० रु.
१४. **तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल ● २५० रु.
१५. **आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे ● १६० रु.
१६. **गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
१७. **बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल ● ६० रु.
१८. **भारतीय सृष्टी**
अनुराधा गांगल ● १२० रु.
१९. **संस्कार**
अनुराधा गांगल ● ६० रु.
२०. **रांगोळी**
अनुराधा गांगल ● १८० रु.
२१. **महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे ● १८० रु.
२२. **मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई ● १२० रु.
२३. **शांबरिका खरोलिक**
श्रीकांत पेटकर ● ६० रु.
२४. **प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील ● १८० रु.
२५. **आनंदाकार**
प्रकाश पेठे ● १०० रु.
२६. **हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर ● ७५ रु.
२७. **एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर ● १५० रु.
२८. **भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन
डॉ. नरेंद्र जाधव ● ५०० रु.
२९. **आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर ● ३०० रु.
३०. **ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर ● १८० रु.
३१. **ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर ● २०० रु.
३२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
३३. **अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे ● १८० रु.
३४. **अजब सहवास**
गो.आ. भट ● १०० रु.
३५. **सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे ● १२० रु.

३६. **यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक**
डॉ. प्रकाश दुकळे ● २५० रु.

३७. **वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित ● ७५ रु.

३८. **कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी ● ३५० रु.

३९. **विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर ● १०० रु.

४०. **उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे ● ५०० रु.

४१. **आठवा चिरंजीव**
डॉ. प्रतिभा मुडगेरीकर ● १५० रु.

४२. **वडोदरा**
प्रकाश पेठे ● ८० रु.

४३. **दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी ● ३५० रु.

४४. **आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १०० रु.

४५. **साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.

४६. **मनस्वी**
बाबूराव चंदावार ● ५०० रु.

४७. **झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी) ● १०० रु.

४८. **एका कवीचे जीवनगाणे वामन कर्डक यांची चरित्रकथा**
बबन लोंढे ● १६० रु.

४९. **आठवणीतील पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे ● ३०० रु.

५०. **अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर ● ३५० रु.

५१. **नाझी नरसंहार**
कुमार नवाथे ● १५० रु.

५२. **डायरी**
प्रवीण बर्दापूरकर ● १८० रु.

५३. **लॉक ग्रिफिन**
वसंत वसंत लिमये ● ५०० रु.

५४. **दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स**
कर्नल सुधीर नाफड ● २२५ रु.

५५. **पश्चिम घाट बचाओ मोहीम**
जगदीश गोडबोले ● २०० रु.

५६. **जीवन आणि स्वास्थ्य**
डॉ. प्रेमानंद रामाणी ● ८० रु.

५७. **जेनेटिक्स कशाशी खातात?**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २५० रु.

५८. **नाही चिरा नाही पणती**
स्मिता भागवत ● २०० रु.

५९. **वानुळा**
साहेबराव चवरे ● १०० रु.

६०. **आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, तर मग अध्यात्म ते काय?**
शरद बेडेकर ● १२० रु.

६१. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१२**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.

६२. **पहाटसरी**
यशवंत पाठक ● ३५० रु.

६३. **अंतरीचे धावे**
यशवंत पाठक ● १५० रु.

६४. **वेगळा विदर्भ**
श्रीपाद जोशी ● २०० रु.

६५. **तिचं अवकाश**
नीलिमा कानेटकर ● ३०० रु.

६६. **हुंदके टाळण्यासाठी**
नीलिमा कानेटकर ● २०० रु.

६७. **शोध**
डॉ. बी.जी. शेखर ● १५० रु.

६८. **कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य**
मयूर देवल ● १०० रु.

६९. **देश, परदेश आणि मी**
गजानन सबनीस ● २०० रु.

७०. **समाजरंग**
ज्ञान मयूर/अनिता कुलकर्णी ● २५० रु.

७१. **माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
नारायण आठवले ● २२५ रु.

७२. **रंग दे बसंती चोला**
स्मिता भागवत ● २०० रु.

७३. **कथा इन्सुलिनच्या शोधाची**
विजय आजगांवकर ● १५० रु.

७४. **ॲबसर्ड थिएटर**
माणिक कानेड ● १६० रु.

७५. **नगरमंथन**
प्रकाश पेठे ● २०० रु.

७६. **घडत गेलेली गोष्ट**
विजया राजाध्यक्ष ● २२५ रु.

७७. **माझं साहित्यिक खटलं**
ॲड. यशवंत हडप ● २२५ रु.

७८. **दत्तकवेणा**
प्रगती कोळगे ● १५० रु.

७९. **क्षितिज पश्चिमेचे**
विनता कुलकर्णी ● २५० रु.

८०. **यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका**
लक्ष्मण माने ● २५० रु.

८१. **तांडव हरवताना**
रवी परांजपे ● २५० रु.

८२. **लसावि**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.

८३. **सारांश शून्य**
संजय कळमकर ● ३०० रु.

८४. **मनाचे कवडसे**
विश्वास काकडे ● १०० रु.

८५. **१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे ● ३५० रु.

८६. **अंतरंग**
विजया राजाध्यक्ष ● १२५ रु.

८७. **ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर ● १२५ रु.

८८. **प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे ● ८० रु.

८९. **कवडसे**
महेश केळुस्कर ● ७० रु.

९०. **वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले ● ८० रु.

९१. **ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण ● १५० रु.

९२. **दु:ख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ ● ६० रु.

९३. **मनोमनी**
जयश्री भिसे ● ७५ रु.

९४. **अरूपाचे रूप**
माणिक गुट्टे ● १२५ रु.

९५. **एक अजब कोलाहल**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.

९६. **काळिजगुंफा**
सदानंद डबीर ● ७५ रु.

९७. **कवितेची वही**
सलोनी धुरी ● ८० रु.

९८. **फुलवेडी**
अरुण शेवते ● ६० रु.

९९. **शब्द तर कुली आहेत**
राजेंद्र काटदरे ● १०० रु.

१००. **तृष्णाकाठ**
वैभव देशमुख ● १०० रु.




डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या हस्ते डॉ. नरेंद्र जाधव लिखित 'प्रज्ञा महामानवाची : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखन' खंड १ आणि खंड २ या पुस्तक प्रकाशनसमयी मान्यवर मंडळी



सुभाषचंद्र मयेकर लिखित 'मी मवाली तुमच्या हवाली' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी लेखक सुभाषचंद्र मयेकर, कालिदास कोळंबकर, वसंत डावखरे, मधु चव्हाण आणि 'ग्रंथाली'चे प्रभाकर भिडे



डॉ. बी.जी. शेखर लिखित 'शोध' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी आदेश बांदेकर, कुलवंत कुमार सारंगल, संजय खंदारे, विलास पाटील, शेखर गायकवाड, विनायकदादा पाटील आणि प्रकाश होळकर इत्यादी



राजीव जोशी लिखित 'जीवनदान' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी किडनी विकारतज्ज्ञ डॉक्टर – डॉ. श्रुती तापीयावाला, डॉ. प्रशांत राजपूत, संगीत दिग्दर्शक प्रीतम, डॉ. दीपक करंजी, डॉ. विद्या आचार्य, डॉ. भरत शहा आणि 'ग्रंथाली'चे धनंजय गांगल

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MH/MR/WEST/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.